दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ५ वे अंक -१३३ शनिवार,दि.१८ जानेवारी २०२५ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४
Beed Daily Marathi Year-5th Issue-133 Saturday, Dt.18 January 2025 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

## शरद पवारांना धक्का! 'या' आमदाराने दिला राजीनामा
## राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये होणार प्रवेश

शरद पवार आणि अजित पवार एकत्र येणार, अशा चर्चा एकीकडे सुरु असताना दुसरीकडे मात्र शरद पवारांच्या समर्थकाने त्यांची साथ सोडली आहे. आमदार चव्हाण आता अजित पवार यरांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश करणार आहेत. मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे आमदार सतीश चव्हाण यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचा राजीनामा दिला आहे. उद्या शिर्डीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे अधिवेशन होत आहे. याच कार्यक्रमामध्ये चव्हाण राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करतील.

विधानसभा निवडणुकीपूर्वी सतीश चव्हाण हे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटामध्ये होते. मात्र निवडणूक लढवण्यासाठी त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटामध्ये प्रवेश केला होता.

# महायुतीत तणाव वाढतोय

## शिंदे गटाचे नेते संजय शिरसाटांचे मोठे विधान, म्हणाले - धस आणि मुंडेंबाबत त्यांचा पक्ष निर्णय घेईल

बीड/प्रतिनिधी

जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर राज्यात वादंग उठले आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मिक कराडचा सहभाग असल्याचा आरोप विरोधक करत आहेत. धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी विरोधकांकडून होत आहे. त्यामुळे राजकीय वातावरण देखील चांगलेच तापले आहे. बीड जिल्ह्यातील प्रकरणावरून महायुतीत तणाव वाढत आहे, असे मोठे विधान शिंदे गटाचे नेते तथा मंत्री संजय शिरसाट यांनी केले. याची जाणीव सर्वांनी ठेवली पाहिजे, असेही ते म्हणाले.

संतोष देशमुख प्रकरणावरून सत्ताधारी आणि विरोधक आमने-सामने आले आहेत. भाजपचे आमदार सुरेश धस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार बजरंग सोनवणे आणि आमदार संदीप क्षीरसागर यांनी हे प्रकरण लावून धरले आहे. संतोष देशमुखयांच्या हत्येच्या निषेधार्थ वेगवेगळ्या जिल्ह्यात मोर्चे काढण्यात आले. या मोर्चांमध्ये तिघांनी धनंजय मुंडे यांच्यावर जोरदार हल्लाबोल करत त्यांच्या राजीनाम्याची मागणी केलेली आहे. त्यातच आता शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना उपरोक्त विधान केल्यामुळे चर्चांना उधाण आले आहे.

काय म्हणाले संजय शिरसाट?

बीड जिल्ह्यात दररोज सुरू असलेल्या बॅटिंग आणि एकमेकांच्या विरोधात आरोप-



प्रत्यारोप, त्यामुळे बीड जिल्ह्यात तणाव वाढत आहे आणि हे सत्य आहे. त्यामुळे महायुतीत निश्चित तणाव वाढत आहे. पण करणार काय? कारण एक भाजपचे आमदार आहेत आणि एक राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे आमदार आहेत. मात्र, तणाव वाढतोय, याची जाणीव सर्वांनी ठेवली पाहिजे, असे संजय शिरसाट म्हणाले.

### मुंडे-धस बाबत त्यांचा पक्ष निर्णय घेईल

बीड जिल्ह्यातील राजकारण स्थानिक असून त्यावर जेवढे बोलावे तेवढे कमी आहे. मात्र, ज्या-ज्या पक्षाचे नेते आहेत, त्या पक्षाच्या नेत्यांनी त्या संदर्भात निर्णय घ्यावा, असे आम्ही स्पष्टपणे सांगितलेले आहे. आता धनंजय मुंडे यांच्याबाबत काय करायचे? ते उपमुख्यमंत्री अजित पवार ठरवतील, तसेच आमदार सुरेश धस यांच्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठरवायचे आहे. आम्ही त्या संदर्भातील निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत नाहीत. आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार वरिष्ठ नेते आहेत. त्यामुळे त्यांना निर्णय घ्यायचा आहे आणि ते जो निर्णय घेतील तो आम्हाला मान्य असेल, असेही संजय शिरसाट म्हणालेत.



## 'बँक ऑफ महाराष्ट्र'च्या जनरल मॅनेजरचे निधन

पुणे : 'बँक ऑफ महाराष्ट्र'चे जनरल मॅनेजर (महाव्यवस्थापक) अतुल जोशी यांचे निधन झाले. अतुल जोशी यांनी ४० वर्ष 'बँक ऑफ महाराष्ट्र'मध्ये वेगवेगळ्या जबाबदाऱ्या हाताळल्या होत्या. बँकेच्या प्रगतीत त्यांचे मोठे योगदान होते. 'बँक ऑफ महाराष्ट्र'च्या व्यवस्थापनाने एनएसई आणि बीएसईच्या अधिकाऱ्यांना नियमानुसार जनरल मॅनेजर अतुल जोशी यांच्या निधनाची माहिती दिली आहे. एनएसई आणि बीएसईच्या अधिकाऱ्यांनीही अतुल जोशी यांच्या निधनाचे वृत्त कळताच दुःख व्यक्त केले.

'बँक ऑफ महाराष्ट्र'ला १४०६ कोटींचा तिमाही नफा

'बँक ऑफ महाराष्ट्र'ला ३१ डिसेंबर २०२४ रोजी संपलेल्या तिमाहीत १४०६ कोटी रुपयांचा निव्वळ नफा झाला. बँकेने या तिमाहीत ७११२ कोटी रुपयांचे उत्पन्न कमावले. 'बँक ऑफ महाराष्ट्र'ने ३१ डिसेंबर २०२४ रोजी संपलेल्या तिमाहीत ६३२५ कोटी रुपयांचे व्याज उत्पन्न मिळवले. बँकेच्या एकूण बुडीत कर्जांमध्ये (ग्रॉस एनपीए) घट होऊन ते १.८० टक्क्यांवर घसरले आहे. तसेच निव्वळ बुडीत कर्जांचे (नेट एनपीए) प्रमाण ०.२ टक्क्यांवर घसरले आहे.

# पुणे-नाशिक महामार्गावर नारायणगाव जवळ भीषण अपघात

## आयशर टेम्पोची ओव्हरटेकच्या प्रयत्नात मॅक्सिमोला धडक; ९ जणांचा मृत्यू

नाशिक /प्रतिनिधी

पुणे नाशिक महामार्गावरील नारायणगाव जवळ एक भीषण अपघात झाला आहे. यात आयशर आणि एसटीच्या मध्ये आल्यानंतर मॅक्सीमो गाडीचा चक्काचूर झाला आहे. या घटनेत ९ जणांचा मृत्यू झाला असल्याची माहिती समोर आली आहे. तर मृतांचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.


याबाबत प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार नाशिक - पुणे महामार्गावर आयशर टेम्पो, प्रवासी वाहतूक करणारी मॅक्सीमो गाडी आणि एसटीमध्ये हा विचित्र अपघात झाला आहे. आयशर टेम्पो हा ओव्हरटेकच्या प्रयत्नात असताना त्याची धडक मॅक्सिमो गाडीला लागल्याची माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली आहे. यामध्ये मॅक्झिमो गाडीचा चक्काचूर झाला आहे. या गाडीतील सर्वच ११ प्रवासी हे गंभीर जखमी झाले आहेत. या प्रवाशांवर नारायणगाव मधील ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि पोलिसांनी धाव घेत, जखमींना तात्काळ खासगी आणि शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत. त्यातील काहींची प्रकृती गंभीर असल्याची माहिती देखील प्रशासनाकडून देण्यात आली.

या बाबत मिळालेल्या अधिकच्या माहितीनुसार पुणे - नाशिक महामार्गावर जात असताना एसटीच्या मागे ही प्रवासी वाहतूक करणारी मॅक्सीमो गाडी जात होती. तर त्याच्या पाठीमागून आयशर गाडी प्रवास करत होती. मात्र आयशरने जोरात धडक दिल्याने मॅक्सीमो गाडी ही बसवर जाऊन आदळली. दोन्ही गाड्यांच्यामध्ये आल्याने मॅक्सीमो गाडी मधील प्रवासी हे गंभीर जखमी झाले आहेत.

मृतांच्या वारसांना ५ लाख रुपये आर्थिक सहाय्य - देवेंद्र फडणवीस

या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील ही दुर्दैवी घटना असल्याचे म्हटले आहे. तसेच त्यांनी मृतांच्या वारसांना मुख्यमंत्री सहायता निधीतून आर्थिक मदत जाहीर केली आहे. या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, 'पुणे-नाशिक महामार्गावर नारायणगाव जवळ झालेल्या भीषण अपघातात ९



कामगारांचा मृत्यू झाल्याची घटना अतिशय दुर्दैवी आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. जखमींच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, अशी प्रार्थना करतो. मृतांच्या वारसांना ५ लाख रुपये आर्थिक सहाय्य मुख्यमंत्री सहायता निधीतून करण्यात येईल. जखमींच्या उपचाराची योग्य काळजी घ्या, असे मी पुणे पोलिस अधीक्षक यांना सांगितले'

## बीड जिल्ह्यात चाललंय तरी काय?

## आता अंबाजोगाईत हवेत गोळीबार, पोलिसांची तातडीने घटनास्थळी धाव

बीड / प्रतिनिधी

बीडच्या अंबाजोगाईत गावठी कट्ट्यातून गोळीबार करण्यात आल्याची गंभीर घटना घडली आहे. सरपंच संतोष देशमुख हत्याकांडामुळे अगोदरच पोलिस प्रशासनाच्या अब्रुची लक्तरे निघाली आहेत. त्यातच ही घटना घडल्यामुळे येथील कायदा सुव्यवस्थेवर चिंता व्यक्त केली जात आहे. या गोळीबाराची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन आपला तपास सुरू केला आहे.

यासंबंधीच्या प्राथमिक माहितीनुसार, अंबाजोगाई शहरातील मोरेवाडी परिसरातील माऊली नगरमध्ये शुक्रवारी दुपारी हा गोळीबार झाला. त्यात गणेश पंडित चव्हाण (रा. गोविंद नगर, ता. रेणापूर) नामक आरोपीने सिद्धेश्वर नवनाथ कदम यांच्यावर गोळीबार केला.

कौटुंबिक वादातून गोळीबार



झाल्याची माहिती

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी गणेश चव्हाण हा सिद्धेश्वर कदम यांच्या पत्नीला गत काही दिवसांपासून कौटुंबिक वादातून सातत्याने धमकी देत होता. या प्रकरणी शहर पोलिस ठाण्यात तक्रारही दाखल करण्यात आली होती. शुक्रवारी सकाळी तो पुन्हा कदम यांच्या घरी येऊन वाद घालू लागला. यावेळी त्याने सिद्धेश्वरच्या दिशेने गोळीबार केला. पण सुदैवाने सिद्धेश्वर यांना गोळी लागली नाही. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. जमिनीच्या वादातून ही घटना घडल्याचा दावा केला जात आहे.

## आष्टीमध्ये सशस्त्र हल्ल्यात २ सख्ख्या भावांचा मृत्यू

दुसरीकडे, बीडच्या आष्टी तालुक्यातील वाहिरा येथे गुरुवारी रात्री दोन गटांत झालेल्या वादात २ सख्ख्या भावांचा बळी गेला आहे. तर आणखी एक जण गंभीर जखमी झाला आहे. अजय भोसले व भर भोसले अशी मृतांची नावे आहेत. तर कृष्णा भोसले हे जखमी तरुणाचे नाव आहे. हे तिघेही गावात एकेठिकाणी उभे असताना त्यांच्यावर सशस्त्र हल्ला चढवण्यात आला.

## बीड जिल्हा खूप चांगला जिल्हा आहे त्याला उगीच बदनाम करू नका - ओमप्रकाश शेटे

मुंबई ।प्रतिनिधी

बीड जिल्हा हा खूप चांगला जिल्हा आहे. या जिल्ह्याला उगीच कोणी बदनाम करू नये. बदनाम होत असलेल्या बीड जिल्ह्याची प्रतिमा बदलण्याची तुमची आमची जबाबदारी आहे असे उघड माझं आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख ओमप्रकाश शेटे यांनी व्यक्त केले आहे.



जी घटना बीड जिल्हात घडली ती घटना निंदनीयच आहे. त्या घटनेतील जे कोणी आरोपी असतील त्यांच्यावर सरकार आणि न्यायव्यवस्था कठोर कारवाई करेल, असा मला विश्वास आहे. या घटनेनंतर बीड जिल्ह्याला ज्या पद्धतीने मीडियाच्या माध्यमातून उभे केले जात आहे. प्रति बिहार म्हणून पाहिले जात आहे. हे अत्यंत चुकीचे आहे. बिहार सारखा बीड जिल्हा नक्कीच नाही. या बीड जिल्ह्याला ऐतिहासिक परंपरा, सुसंस्काराची परंपरा, संत विचारांची परंपरा कायम लाभलेली आहे लाभत राहील. १८ पगड जाती जमातीचे लोक बीड जिल्ह्यामध्ये गुण्यागोविंदाने राहतात. कधीही बीड जिल्ह्यामध्ये आज पर्यंत जातिवाद झाला नाही. मला कोणत्याही राजकीय वादात आणि फंदात पडायचे नाही. त्यामुळे मी या विषयावर बोललो नाही. मात्र सातत्याने बीड जिल्ह्याची जी बदनामी त्या घटनेवरून होत आहे त्यावरून मनामध्ये खेद होत आहे. आज बीड जिल्हा मोठ्या प्रमाणावर बदनाम झाला आहे. बीड जिल्ह्यातील जे रहिवासी इतर जिल्ह्यांमध्ये कार्यरत आहेत, जे विद्यार्थी बाहेरगावी शिकायला आहेत. त्यांना आम्ही बीड जिल्ह्यातील आहोत असा कधीकाळी स्वाभिमान वाटत होता.तो आज दुर्दैवाने राहायला नाही. या बीड जिल्ह्याला मोठे करण्यासाठी लोकनेत्या क्षीरसागर काकूंचा परिवार,लोकनेते गोपीनाथराव मुंडे, लोकनेते स्वर्गीय विनायकराव मेटे यांनी यामागास जिल्ह्याला विकासाच्या उंबरठ्यावर आणले. एवढेच नव्हे तर बीड जिल्ह्यातील प्रत्येकाच्या मनात स्वाभिमानाने आवाज बुलंद करण्याचे संस्कार रुजवले. आजही माझ्याकडे जर कोणी आलं आणि त्याचा आवाज मोठ्याने असेल तर मी माझ्या कर्मचाऱ्यांना सांगून ठेवल आहे. ज्यांचा आवाज मोठा असेल ते एक तर माझ्या बीड जिल्ह्यातील असतील नाहीतर माझ्या सासुरवाडी मधील असतील. त्यांना बाहेर ताटकळत ठेवायचे नाही. त्यांची तात्काळ भेट घालून द्यायची. जनसेवेसाठी माझे दरवाजे २४ तास खुले आहेत. मी बीड जिल्ह्याची होत असलेली बदनामी पाहून अस्वस्थ होत आहे. त्यामुळेच आता या जिल्ह्याची बदललेली घडी आणि बदनाम झालेले नाव पुन्हा एकदा चांगल्या उंचीवर घेऊन जाण्यासाठी तुम्ही आम्ही आता जबाबदारी स्वीकारली पाहिजे. या जिल्ह्यात चांगले काम करणारे तुमच्या माझ्यासारखे अनेक जण आहेत ना ? हे सुद्धा जगासमोर आले पाहिजे. असे खुले आवाहन आरोग्य दूत आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख ओम प्रकाश शेटे यांनी केले आहे.

## पत्रकार संघाच्या प्रदेश संपर्कप्रमुख पदी वैभव स्वामी यांची निवड

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी यांचे संघटन कौशल्य, उपक्रमशीलता लक्षात घेऊन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मा. श्री संजयजी भोकरे साहेब यांच्या सूचनेनुसार पत्रकार संघाच्या प्रदेश संपर्कप्रमुख पदी वैभव विवेक स्वामी यांची निवड केली असल्याबाबत प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे यांनी जाहीर केले आहे.



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे मागील दहा वर्षांपासून बीड जिल्हाध्यक्ष त्याचबरोबर मागील पाच वर्षांपासून मराठवाडा विभागीय अध्यक्ष पद सांभाळत असताना वैभव स्वामी यांनी विविध उपक्रमशील उपक्रम राबवून पत्रकार संघाचे नाव उंचावण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. त्याचबरोबर संघटन कौशल्य वापरून पत्रकार संघाचे सभासद, पदाधिकारी जोडण्याचे काम मराठवाडास्तरावर प्रामुख्याने केले. यामुळे त्यांना पत्रकार संघाने त्यांना राज्यस्तरीय उपक्रमशील अध्यक्ष म्हणून तीन वेळा राज्यस्तरीय मेळाव्यामध्ये पुरस्कार देऊन सन्मानित केले. त्यांच्या कार्याची दखल घेऊनच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे संस्थापक संघटक मा. श्री संजय भोकरे साहेब यांच्या आदेशानुसार पत्रकार संघाच्या राज्य कार्यकारिणीने पत्रकार संघाचे ध्येयधोरण आणि संघटना वाढीसाठी ग्रामीण व शहरी पत्रकारांच्या समस्या प्राधान्याने सोडवण्यासाठी त्यांच्यावर प्रदेश संपर्कप्रमुख या राज्यस्तरावरील मानाच्या आणि सन्मानाच्या पदावर संधी दिल्याने त्यांचे मराठवाड्यासह राज्यस्तरातून अभिनंदन होत आहे.

शिवसमर्थ मुळव्याध हॉस्पिटल
ॲडव्हान्स ॲनोरेक्टल (पाईल्स) लेझर सेंटर

डॉ. प्रशांत श.ढाकणे
M.B.B.S., M.D. (Anaesthesia)
भुलतज्ञ
डॉ.मीरा प्र.ढाकणे (नागरे)
B.A.M.S., M.S. (Shalya)
मुळव्याध, भगंदर व लेबर सर्जन

आपल्या बीड शहरामध्ये प्रथमच..... महिला मुळव्याध तज्ञ
डॉ. सौ. मीरा प्र. ढाकणे (नागरे) महिला रुग्णांच्या तपासणी करीता उपलब्ध राहतील
मुळव्याध करीता विशेष उपचार
* लेजर उपचार
* इंजेक्शन उपचार
* ऑपरेशन उपचार
* क्षारसुत्र उपचार,
* मुळव्याध, भगंदर
* फिशर, मलबध्दता
* संडासवाटे रक्तस्त्राव होणे.
* बस्ती उपचार
* स्तनातील गाठी
* शरीरावरील सर्व प्रकारच्या गाठी
* स्तनामध्ये पु होणे.
* मोस, जामखीळ व कुरुप काढणे
* गर्भावस्था किवा प्रसुतीनंतर
* मुळव्याध करीता विशेष आयुर्वेद उपचार
हॉस्पीटलचा पत्ताशिवसमर्थ मुळव्याध हॉस्पीटल साई कॉम्पलेक्स, आदर्श नगर, डि.पी.. रोड बसस्टॅन्डच्या पाठीमागे, डॉक्टर लाईन, बीड मो.क्र.9623079009

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

## संपादकीय

# मर्दुमकीच्या मर्यादा

गेले सुमारे ४६६ दिवस अव्याहत सुरू असलेला गाझातील नरसंहार संपुष्टात येण्याची चिन्हे दिसत आहेत. इस्रायल आणि हमास यांच्यात बराच काळ लटकलेला युद्धविराम आता निश्चित मार्गी लागेल असे दिसते. येत्या रविवारपासून तो अमलात येईल असे सांगितले जाते. तथापि त्यास इस्रायली मंत्रिमंडळाची मान्यता अद्याप मिळालेली नाही. पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू मंत्रिमंडळातील अति-कडवे अद्याप या शस्त्रसंधीस राजी नसावेत. तेही माथेफिरूच. म्हणजे हा इस्लामी आणि यहुदी माथेफिरू यांच्यातील संघर्ष. अशा संघर्षांत कंगाल माथेफिरूंचे नुकसान अधिक होते. तसे ते हमासमुळे गाझा पट्ट्यातील पॅलेस्टिनींचे झाले. सुमारे ४६ हजार अश्रापांचे प्राण गेल्यानंतर, प्रदीर्घ काळ भरून न येणारी भौतिक हानी झाल्यानंतर, लाखोंचे संसार शब्दश: उघडयावर आल्यानंतर ही युद्धविरामाची संधी त्यांच्या समोर आली. हमास आणि पॅलेस्टिनी दहशतवादी संघटनांनी या संघर्षांत माणसे गमावली तर इस्रायलने मान. इतके दिवस इतक्या प्रचंड नरसंहारात जवळपास संपूर्ण गाझा बेचिराख केल्यानंतर, पॅलेस्टिनींच्या घरादारासह इस्पितळांवर गाढवाचे नांगर फिरवल्यानंतरही जगातील ही अव्वल दर्जाची लष्करी ताकद आपल्या शंभरभर ओलिसांची सुटका काही करू शकली नाही. अखेर मुर्दाड हमासप्रमाणे मस्तवाल इस्रायललाही युद्धविरामाचे महत्त्व पटले. गाझा पट्टयात नागरिक आता सुटकेचा नि:श्वास सोडतील आणि आपले मोडके-तोडके आयुष्य पुन्हा उभारू लागतील.

इस्रायल आणि हमास या पॅलेस्टिनी बंडखोर संघटनेदरम्यान सुरू असलेला हा संघर्ष तात्पुरता थांबविण्याविषयी घोषणा यापूर्वीही झाल्या होत्या. तरीही संहार, युद्धखोरी थांबली नाही. ताज्या विरामाविषयी अमेरिकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासह अनेकांनी छातीठोक घोषणा केल्या. त्यास २४ तास उलटून गेल्यानंतरही इस्रायलच्या मंत्रिमंडळाची मंजुरी मिळालेली नव्हती. सुरुवातीच्या सहा महिन्यांनंतरच तात्पुरत्या युद्धविरामाच्या वाटाघाटींनी वेग पकडला होता. पण हमासचे नेते हेका सोडायला तयार नव्हते आणि इस्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांनीही हा प्रश्न त्यांच्या राजकीय प्रतिष्ठेचा केला. हमासने ७ ऑक्टोबर २०२३ रोजी इस्रायलच्या अनेक सीमावर्ती भागांमध्ये अविचारी आणि नृशंस हल्ले करून जवळपास १२०० इस्रायली नागरिक व सैनिकांना ठार केले आणि जवळपास २५० नागरिकांचे अपहरण करून त्यांस बंदी बनवले. वास्तविक त्या वेळी नेतान्याहूंचे राजकीय स्थान डळमळीत होते. अल्पमतातील सरकारमध्ये अत्यल्प असूनही कडव्या उजव्या विचारसरणीच्या पक्षांचा आवाज मोठा होता. शिवाय असा हल्ला होणे आणि त्याची जराशी चाहूलही इस्रायली गुप्तचरांना वा लष्कराला न लागणे हे नेतान्याहू सरकारचे नाक कापणारे होते. अशा वेळी लज्जारक्षणार्थ इस्रायलने नेहमीचा लष्करी राष्ट्रवादाचा मार्ग पत्करला. तो त्या वेळी अस्थिर नेतान्याहूंना राजकीयदृष्ट्या सोयीचाच होता. त्यामुळे आजूबाजूचे अरब देश शांतता चर्चेसाठी पुढाकार घेत असताना इस्रायल मात्र युद्धखोर आणि विस्तारवादीच राहिला. तरीदेखील या वेळी नेतान्याहूंनी पत्करलेला 'स्वयंबचावाचा' मार्ग कमालीचा हिंसक आणि अघोरी ठरला. स्वदेशीय १२०० नागरिकांच्या जिवाची किंमत गाझातील ४६ हजारांहून अधिक नागरिकांना इस्रायली हल्ल्यांमध्ये प्राण गमावून चुकवावी लागली. जवळपास तितकेच विस्थापित झाले.

# कालकथित एम. एस. घोक्षे गुरुजी अनंतात विलीन

## 'चैत्यभूमीवर' शोकाकुल वातावरणात अस्थी विसर्जन

गेवराई ।प्रतिनिधी

आंबेडकरी चळवळीतील विचारवंत तथा विद्यार्थीप्रिय आदर्श शिक्षक, निवृत्त मुख्याध्यापक कालकथित एम. एस. घोक्षे गुरुजी यांचा 'अस्थी विसर्जन विधी' मुंबईच्या 'चैत्यभूमीवर' शोकाकुल वातावरणात संपन्न झाला.'भारतरत्न' डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पावन अस्थींचे स्मारक असलेल्या मुंबईच्या दादर येथील 'चैत्यभूमीवर' आंबेडकरवादी विचारवंत कालकथित एम. एस. घोक्षे गुरुजी यांच्या अस्थींचे विसर्जन अत्यंत शोकाकुल वातावरणात करण्यात आले. मुंबईच्या सभोवताली अथांग पसरलेल्या अरबी समुद्रात नातलगांच्या उपस्थितीत 'चैत्यभूमीवर' बौद्ध पद्धतीने हा विधी संपन्न झाला.कालकथित एम. एस. घोक्षे गुरुजी यांचे ज्येष्ठ सुपुत्र प्रा. बापू घोक्षे, ड. बाबासाहेब घोक्षे, डॉ. बाळासाहेब घोक्षे यांच्या हस्ते प्रमुख विधी



संपन्न झाला असून गुरुजींच्या कन्या सुनिता वक्ते, राजेश्री मस्के, महानंदा नन्नवरे या प्रसंगी उपस्थित होत्या. गुरुजींचे पुतणे अशोक भाऊराव घोक्षे, बाळूराज भाऊराव घोक्षे, राहूल लक्ष्मण घोक्षे, गुरुजींच्या स्नुषा संगीता बाळूराज, विजया राहूल, बंधू चंद्रकांत कचरू घोक्षे, आनंद शंकर घोक्षे, जनार्दन बाबुराव घोक्षे यांच्यासह पुतणे संजय रंगनाथ घोक्षे, कमल मोहन शिंदे, भाचे संध्या यादव, राजू गंगाधर घोक्षे, नातवंडे विशाखा, सुरज, राज, मिताली, छकुली, प्रसिद्ध गायक डॉ.शैलेंद्र पवार, विश्वकर्मा रोंगे, डॉ. लिंबाजी खरात आदी मान्यवरांची उपस्थिती होती...

'चैत्यभूमी'चे प्रमुख भदंत यांनी विधी संपन्न केला तर संचालन प्राचार्य संजय घोक्षे यांनी केले. या कठिण काळात ज्यांनी घोक्षे परिवाराचे मनोधैर्य वाढवले, सोबत राहिले, त्या सर्वांचे 'घोक्षे परिवार' ऋणी असून आपले प्रेम असेच असू द्या, असे प्रा. बापू घोक्षे मिडियाशी बोलतांना म्हणाले.

# महाराष्ट्र एनएसएसच्या १२ स्वयंसेवकांचा कर्तव्यपथावरील संचलनासाठी सराव

नवी दिल्ली ।प्रतिनिधी

प्रजासत्ताक दिनाच्या पथसंचलनासाठी महाराष्ट्रातील राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस)चे १२ आणि गोव्यातील ०२ असे एकूण १४ स्वयंसेवक कर्तव्यपथावर तसेच जवाहरलाल नेहरू स्टेडियममध्ये भर थंडीत कसून सराव करीत आहेत.राजधानी दिल्ली येथे ७६ व्या प्रजासत्ताक मुख्य कार्यक्रमासाठी केंद्रीय क्रीडा व युवक कल्याण मंत्रालयाच्यावतीने एन एस एसच्या सराव शिबिराला जवाहरलाल नेहरू स्टेडियम येथे सुरुवात झालेली आहे. या सराव शिबिरात देशभरातून राष्ट्रीय सेवा योजनेचे एकूण २०० स्वयंसेवक सहभागी झाले आहेत. हे शिबिरार्थी योग, कवायत, परेड संचलन सराव, बौद्धिक सत्र, सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी आहेत.

महाराष्ट्रातील स्वयंसेवकांनी सांस्कृतिक कार्यक्रमात राज्यात साजरे होणारे विविध सणांचे सादरीकरण केले. या अंतर्गत 'मकरसंक्रातीचे महाराष्ट्रातील महत्व' या सादरीकरणाला उपस्थितांनी दाद दिली. या बरोबर १० ते १२ जानेवारी रोजी सर्व शिबिरार्थी राष्ट्रीय युवक महोत्सवानिमित्त भारत मंडपम प्रगती मैदान येथे सहभागी झाले होते.हे शिबिर ३१ जानेवारी २०२५ पर्यंत चालणार असून दररोज सकाळी सहा ते रात्री दहा वाजेपर्यंत विविध कार्यक्रमांचे सराव करीत असतात, अशी माहिती महाराष्ट्रातून एन एस एस च्या स्वयंसेवकांना घेऊन येणारे डॉ बी. एन. पुरंदरे कला, श्रीमती एस. जी. गुप्ता वाणिज्य व श्रीमती एस. ए. मिठाईवाला विज्ञान महाविद्यालय, लोनावाळा



कॉलेजचे प्राध्यापक डॉ. पवन शिनगारे सद्या कार्यक्रम अधिकारी म्हणून आलेले आहेत त्यांनी दिली.

महाराष्ट्रातील विद्यार्थी विद्यार्थिनींचा असणार समावेश

महाराष्ट्रातून एकूण बारा एनएसएसचे विद्यार्थी सहभागी झालेले आहेत. यातील ११ विद्यार्थी विद्यार्थिनी हे मुख्य पथसंचलनात असणार आहेत. एकूण सहभागी झालेले स्वयंसेवक हे राज्यातील विविध कॉलेजमधून आहेत. सिटी प्रीमियर कॉलेजचा तेजस सोनसरे, जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर येथील श्रीमती जी. जी. खडसे कॉलेजचा हरीओम इंगळे, नाशिक जिल्ह्यातील ( निफाड, लासलगाव ) एन व्ही पी मंडल्स आर्ट्स, कॉमर्स, सायन्स कॉलेजचा स्वरूप ठाकरे, वर्धा जिल्ह्यातील बजाज कॉलेज ऑफ सायन्सचा गुरु प्रसाद सतोने, मुंबई येथील के सी कॉलेजचा, आदित्य चंदोला, विद्यालंकार स्कूल ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीमधला राहुल धर्मराज, केटीएचएम कॉलेज नाशिक येथील कविता शेवरे, भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजीनियरिंग फॉर वूमन पुणे येथील वेदिका राजेमाने, हुजूरपागा श्रीमती दुर्गाबाई मुकुंदास महिला विज्ञान महाविद्यालय पुणे येथील पूजा बोंडगे, महात्मा फुले कॉलेज ऑफ सोशल वर्क तलोडा येथील सुनिता उंद्या, लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय धर्माबाद येथील अभिज्ञा मानुरकर, श्री आर एल टी कॉलेज ऑफ सायन्स, अकोला येथील लीना आठवले असे एकूण बारा विद्यार्थी एन एस एस च्या शिबिरात सराव करीत आहेत.

गोवा राज्यातून दोन स्वयंसेवकांचा समावेश असून विद्या प्रबोधिनी कॉलेज ऑफ कॉमर्स एज्युकेशन कम्प्युटर अँड मॅनेजमेंट, प्रवरी येथील फाल्गुन प्रीओलकर आणि गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ आर्ट सायन्स अँड कॉमर्स खंडोला येथील अक्षता कलासगौदर चा समावेश आहे.या शिबिरासाठी भारतातून २०० स्वयंसेवक सहभागी झाले आहेत. यामधून १४८ स्वयंसेवक कर्तव्यपथ येथे प्रजासत्ताक दिनी पथसंचलन करतील. हा एकूण चमु प्रधानमंत्री यांना आणि राष्ट्रपती यांनाही भेटणार आहेत आहेत.

# साहित्य भरकटलेल्या समाजाला दिशा देण्याचे काम करते-डॉ.दिपाताई क्षीरसागर

## सातव्या एकता मराठी साहित्य संमेलनाचे थाटात उद्घाटन

मानूर ।प्रतिनिधी

(राष्ट्रसंत भगवान बाबा साहित्य नगरी, दहिवंडी) वाचन संस्कृतीला दृष्य माध्यमांनी ग्रासलं असून त्यामुळे समाजात स्वार्थीपणा आणि संकुचितपणा वाढत चालला आहे.समाजाला दिशा देण्याचे काम साहित्य करत असुन शहरी भागासह ग्रामीण भागात साहित्य संमेलनाचे मोठ्या प्रमाणावर आयोजन करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन सातव्या एकता मराठी साहित्य संमेलनाच्या संमेलनाध्यक्षा प्राचार्या डॉ. दिपाताई क्षीरसागर यांनी केले.त्या तालुक्यातील दहिवंडी येथील राष्ट्रसंत भगवान बाबा साहित्य नगरीत आयोजित केलेल्या सातव्या एकता मराठी साहित्य संमेलनाच्या संमेलनाध्यक्षा पदावरून बोलत होत्या.या वेळी व्यासपीठावर उद्घाटक माजी मंत्री तथा आमदार सुरेश धस यांचे प्रतिनिधी म्हणून युवा नेते जयदत्त धस यांच्यासह पद्मश्री शब्बीर सय्यद,ज्येष्ठ साहित्यिक डॉ.भास्कर बडे,स्वागताध्यक्षा ड.भाग्यश्री ढाकणे,साहित्य व संस्कृती मंडळाचे सदस्य डॉ.राजेश



गायकवाड,माजी सदस्य विलास सिंदगीकर,सरपंच कालिदास आघाव,उपसरपंच रवि आघाव,माजी सरपंच शिला आघाव,लोकनेते गोपीनाथ मुंडे शिक्षक सहकारी पतसंस्थेचे चेअरमन दिलीप जायभाये,स्टेट बँक ऑफ इंडियाचे शाखाधिकारी प्रविण हासे,डॉ.आर.एस. बडजाते,महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य बाबुराव जायभाये यांची उपस्थिती होती.या वेळी बोलताना दिपाताई क्षीरसागर म्हणाल्या की,मातृभाषेत बोलणे गैर नाही.मराठी माणसाने मराठी माणसाशी मराठीतूनच बोलावे.मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे.समाजात सध्या मोठ्या प्रमाणावर जातीय,प्रादेशिक,भाषिक वाद वाढत आहे.त्यासाठी सर्वांनी मतभेद विसरून एकत्र आले पाहिजे.मनाची उदारता कृतीतून दिसली पाहिजे.संत साहित्यात उत्तम माणूस घडविण्याची ताकद आहे.व्यक्तीवर सुसंस्कार हे वाचनामुळे होतात.मोबाईलच्या अतिवापरामुळे घरात संवाद राहिला नाही.माणुसकी हरवल्याचे चित्र सध्या दिसत असुन हे निश्चितच निराशाजनक असल्याचे देखील क्षीरसागर म्हणाल्या.या वेळी कार्यक्रमाला एकता फाउंडेशनचे अध्यक्ष अनंत कराड,कोषाध्यक्ष शिवलिंग परळकर,महिला आघाडीच्या अध्यक्षा रंजना फुंदे,लता कराड,रंजना डोळे,दिपक महाले,नितीन कैतके,राजेश बीडकर,रमेश बडे,सुग्रीव केदार,संदीप शिरसाट,बळीराम तोगे,दिपाली नाईक,अनिता आंधळे,लक्ष्मण चांदणे,नबिलाल सय्यद यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्रंथदिंडीने वेधले लक्ष

साहित्य संमेलनाची सुरुवात सकाळी नऊ वाजता हनुमान मंदिरापासून ग्रंथदिंडीने झाली.या वेळी महापुरुषांच्या वेशभूषा परिधान करून विद्यार्थी दिंडीत सहभागी झाले होते.सदरील ग्रंथदिंडीचे समेलंस्थळापर्यंत येताना गावातील महिलांनी आपल्या दारासमोर रांगोळी काढून स्वागत करण्यात आले.



# परतूर पोलिसांनी गोवंशानी भरलेले दोन आयशर टेम्पो पकडून त्यांची कत्तली पासून केली सुटका

## २० लाखाचा मुद्देमाल जप्त


परतूर।प्रतिनिधी

दि.१६ रोजी रात्री परतूर पोलिस यांना मिळलेल्या गुप्त माहितीवरून गोवंशीय जनावरांना कत्तलसाठी जालना येथून परभणी येथे घेऊन जात असताना मांगीरबाबा चौक परतूर येथे दोन आयषर अडवून त्यांची झडती घेतली असता त्यामध्ये एकूण ३२ गोवंशीय बैल जनावरे मिळून आले आहेत, त्यांची विचारपूस केली असता परभणी येथे कत्तल खाण्यात घेऊन जात असल्याचे समजले, एकूण ३२ जनावरे किंमत ४ लाख ८५ हजार रुपये आणि आयशर टेम्पो किंमत १६ लाख रुपये, असा एकूण २० लाख ८५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे, सर्व जनावरे जप्त करून पारडगाव येथील गोशाळेत जमा केले आहे. यामध्ये आरोपी नामे कुनजऱ्या जुआनसिंग बोर्डे रा. बळखाड ता. शेंदवा जि. बडवणी मध्य प्रदेश, मुस्ताक सुपडू शेख रा. सावदा ता. जि. जळगाव, नदीम अख्तर हमीद अन्सारी रा. मालेगाव जि नाशिक,अस्लम फकिरा शेख रा. पाचोरा जि. जळगांव यांच्यावर पोस्टे परतूर येथे दोन वेगवेगळे गुन्हे दाखल केले करून आयशर टेम्पो जप्त करून कारवाई केली आहे, सदरची कारवाई ही मा. श्री. अजय कुमार बंसल, पोलिस अधीक्षक जालना, मा. श्री.आयुष नोपाणी,अप्पर पोलिस अधीक्षक जालना, मा. श्री दादहरी चौरे,उप विभागीय पोलिस अधिकारी,परतूर यांच्या मार्गदर्शनाखाली एम.टी.सुरवसे,पोलिस निरीक्षक, पोलिस स्टेशन परतूर.भिमराव मुंढे,पो उप निरिक्षक पोकॉ/ दीपक आढे पोकॉ/अचुत चव्हाण पोकॉ/ज्ञानेशोर वाघ पोकॉ/देवा जाधव,पोकॉ/ राम पारवे,चालक/पोकॉ स्वप्नील फंड यांनी केली आहे.

# रात्री शांत झोप येत नाही का ?

बीड ।प्रतिनिधी

आज-काल धावपळीच्या युगात रात्री शांत झोप न येणे ही एक कॉमन समस्या झालेली आहे का ? रात्री शांत झोप येणे ही सर्व वयोगटातील समस्या आहे का ? ज्या व्यक्तीला रात्र रात्र झोप येत नाही. झोप येण्यासाठी तो तडफडत असतो. झोप येत नाही म्हणून कासावीस होऊन अस्वस्थ होत असतो. अनिद्रांचे परिणाम व्यक्तीच्या शरीर मनावर पडत असतात. त्याला झोपेचे महत्त्व काय आहे हे समजत असते. याबाबत आपण थोडसं जाणून घेऊया...



रोज व्यक्तीला सहा ते आठ तासाची झोप घेणे आवश्यक असते. हे आपल्याला माहीतच आहे. परंतु दिवसभराच्या कामाच्या दगदगीनंतर अनेकांना रात्री लवकर झोप येत नाही. रात्री व्यवस्थित झोप आली नाही तर दिवसभर फ्रेश वाटत नाही.मग शांत झोप न झाल्यावर थकवा येतो. कोणत्याही कामात उत्साह जाणवत नाही असे आपल्या सोबत होत आहे का ?

मग झोप कोणाला येत नाही...

ज्या व्यक्ती धोका, काळजी, भीती, त्रास, इर्शा, द्वेष, दुःख, टेन्शन, भावनिकता, एकटेपणा आणि अस्वस्थ मानसिकतेत जीवन जगत असतात त्यांना झोप येत नाही का ?

शांत झोप येत नाही म्हणून खालील काही कामे करतो का ?

१. अनेक चुकीच्या कृती पुन्हा पुन्हा केल्या जातात का ?

२. झोप येत नाही म्हणून मोबाईलवर टाईमपास केला जातो का ?

३. मोबाईलवर टाईमपास होतो म्हणून पुन्हा झोप मोड होते का ?

४. झोप येत नाही तेव्हा जास्तच नकारात्मक वेदनादायी व अस्वस्थ बेचैन करणारे त्याचबरोबर आत्महत्या सारखे विचार जास्त येतात का ?

५. झोप न झाल्यामुळे आपल्या शारीरिक आणि मानसिकतेवर क्षमतेवर आरोग्यावर भविष्यातील योजनेवर कामाच्या दर्जावर परिणाम पडतो का ?

६. झोप न झाल्यामुळे शारीरिक व मानसिक थकवा अधिक जाणवतो का?

७. रात्री कौटुंबिक विषम वाद चिडचिड झाल्यास अति भीती काळजी टेन्शन दुःख त्रास चिडचिड एकटेपणा असुरक्षितता प्रेमाचा अभाव अशा भावना झोपण्यापूर्वी सतत मनात निर्माण होत असतील तर झोप व्यवस्थित होईल का ?


८. नकारात्मक विचार अपेक्षा व भावना यांची घुसमट होत आहे का ? याचा परिणाम आपल्या झोपेवर पडतो का ?

९. भूतकाळात नको असलेल्या घटना पुन्हा पुन्हा डोळ्यासमोर येतात का ? यामुळे झोप शांत होत नाही का ?

१०. भूतकाळात जे झाले ते पुन्हा येऊ शकत नाही तरी सुद्धा ते विसरत नाही का ?

निसर्गचक्रानुसार अंधार पडला की तीन तासात गरजे इतका झोपेचा हार्मोन्स स्त्रावतो त्यामुळे झोप येत असते.

विचार, आहार, व्यायाम आणि झोप प्रत्येक व्यक्तीला खूप गरजेची आहे. या सिक्वेन्स मध्ये कमी जास्त प्रमाणामध्ये बदल झाला की मेंदूमध्ये काही संप्रेरक कमी जास्त प्रमाणामध्ये स्त्रावतात त्यामुळे नको असलेल्या घटना समस्या आपल्याला उद्भवत असतात. मग तुमच्या जीवनामध्ये सुद्धा असं काही होत असेल तर खालील दिलेल्या नंबर वर कॉल करा.वेळेवर त्याचे निराकरण केलं नाही तर निद्रानाश व बरच काही होऊन आपल्याला मानसिक गंभीर आजार होऊ शकतो आणि शारीरिक आजाराला तोंड फुटते म्हणून आपण वेळीच यावर उपाय केला पाहिजे.



**संपर्क / लेखिका**
**मनीषा बिक्कड/घुले**
कौन्सलर / सायकॉलॉजिस्ट
९४४५४४०४७१

# राज्य लोकसेवा हक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी- आयुक्त डॉ. किरण जाधव

जालना ।प्रतिनिधी

नागरिकांना पारदर्शकपणे व दिलेल्या विहित कालावधीमध्ये सेवा मिळावी तसेच त्यांच्या हक्काची जाणीव करुन देण्याच्या उद्देशाने हा राज्य लोकसेवा हक्क कायदा लागू करण्यात आला आहे. या कायद्याच्या माध्यमातून प्रशासनाने नागरिकांच्या दारात पोहोचून विहित कालमर्यादेत शासकीय विभागांच्या अधिसूचित सेवा मिळविण्यासोबतच, शासनाची प्रतिमा उंचाविण्यासाठी या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे आवाहन राज्य लोकसेवा हक्क आयोगाचे आयुक्त डॉ. किरण जाधव यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात राज्य लोकसेवा हक्क कायदा अंमलबजावणीबाबतच्या आढावा बैठकीत मार्गदर्शन करतांना डॉ. किरण जाधव बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना, पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, उपजिल्हाधिकारी (सा.) नम्रता चाटे, महापालिका आयुक्त संतोष खांडेकर, कक्ष अधिकारी संजीव शिंदे, जिल्हा प्रकल्प प्रमुख प्रल्हाद तारख आदींची प्रमुख उपस्थिती होती.

आयुक्त डॉ. जाधव म्हणाले की, आपले ब्रिदवाक्य जनतेची सेवा हेच आमचे कर्तव्य असले पाहिजे आणि याच भावनेतून महाराष्ट्रातील जनतेला भ्रमणध्वनीद्वारे अर्ज केल्यास त्यांना डिजीटल प्रमाणपत्रही तात्काळ मिळायला हवे याच दिशेने प्रशासनाने



सकारात्मक दृष्टीकोनातून वाटचाल करायला हवी. नागरिक कार्यालयात आल्यानंतर त्यांना का र्यालय स्वच्छ दिसून त्यांचे मन प्रसन्न व्हावे अशी आसन व्यवस्था कार्यालयाने करायला पाहिजे. आपले सरकार व्हर्जन-२ ला मान्यता मिळाली असून विहीत कालमर्यादेत सेवा पुरविण्यासाठी पावले उचलली गेली आहेत. जिल्ह्यातील सर्व आपले सरकार सेवा केंद्रावर तक्रार पेटी ठेवण्यात यावी. आपले सरकार केंद्रातून अर्ज सादर करतावेळी केंद्र चालकाने स्वत:चा किंवा इतर भ्रमणध्वनी अर्ज भरताना न टाकता केवळ अर्जदारांचा भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करावा जेणेकरुन त्रुटी पुर्ततेसाठी संबंधित अर्जदाराला योग्य ती माहिती वेळेत प्राप्त होईल. राज्य शासनाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय विभाग तसेच प्राधिकरणे यांच्या ९६९ सेवा अधिसूचित करुन त्या सेवांचा लाभ ऑनलाईन स्वरुपात नागरिकांना उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. आपले सरकार केंद्रामधुन विविध सेवांसाठी अर्ज आणि अपील दोन्ही करता येतात. हा कायदा नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त असून, या कायद्याची माहिती जनतेला व्हावी यासाठी प्रत्येकाने आपल्या कार्यालयाच्या दर्शनी भागात या कायद्याच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या सेवांची व त्यासाठीच्या कालमर्यादेची माहिती डकवणे बंधनकारक आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीने प्रशासन अधिक गतिमान आणि पारदर्शक होण्यास मदत होणार आहे. विहित कालमर्यादेत काम न करणाऱ्या अधिकाऱ्यासाठी पाचशे रुपयांपासून ते पाच हजार रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद या अधिनियमात करण्यात आली

# मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त आयोजित ग्रंथ विक्री प्रदर्शन स्तुत्य उपक्रम

## खासदार निलेश लंके आणि शोभा बच्छाव यांनी व्यक्त केल्या भावना

नवी दिल्ली ।प्रतिनिधी

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त ग्रंथ विक्री प्रदर्शनाचे आयोजन स्तुत्य उपक्रम असल्याच्या भावना ग्रंथ विक्री प्रदर्शन उद्घाटनप्रसंगी लोकसभा खासदार निलेश लंके आणि शोभा बच्छाव यांनी व्यक्त केल्या. कस्तुरबा गांधी मार्गस्थित महाराष्ट्र सदन येथे निवासी आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र सदन आणि महाराष्ट्र परिचय केंद्राच्या संयुक्त विद्यमाने 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' साजरा करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून पुस्तक विक्री प्रदर्शन हा उपक्रम राबविण्यात आला आहे. पुस्तक विक्री प्रदर्शनाचे हे तिसरे वर्ष आहे.

या पुस्तक विक्री प्रदर्शनाचे उद्घाटन खासदार निलेश लंके आणि शोभा बच्छाव यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी सदनच्या निवासी आयुक्त निवा जैन, सहायक निवासी आयुक्त स्मिता शेलार, महाराष्ट्र परिचय



केंद्राच्या उपसंचालक अमरज्योत कौर अरोरा, माहिती अधिकारी अंजु निमसरकर, महाराष्ट्र सदनच्या व्यवस्थापक भावना मेश्राम यांच्यासह महाराष्ट्र सदन आणि परिचय केंद्राचे अधिकारी कर्मचारी आणि सदनातील अभ्यागत याप्रसंगी उपस्थित होते.

उभय खासदारांनी महाराष्ट्र शासनाचा मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त आयोजित कार्यक्रमाचे कौतुक करून राजधानी दिल्लीत असणाऱ्या मराठी माणसांसाठी पुस्तक खरेदीची चांगली संधी उपलब्ध करून दिली असल्याचे मनोगत व्यक्त केले. अधिकाधिक मराठी भाषिक लोकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन ही त्यांनी यावेळी केले.

या ग्रंथ प्रदर्शनात राष्ट्रीय पुस्तक न्यास (एनबीटी), साहित्य अकादमी, पॉप्युलर प्रकाशन, मुळ मराठी भुमिपुत्र मात्र दिल्ली हिंदी साहित्य वर्तुळात नावाजलेले लेख आणि प्रकाशक लक्ष्मण राव यांचे भारतीय साहित्य कला प्रकाशन यांचेही पुस्तक विक्री येथे मांडण्यात आले आहे.भारतीय साहित्य, संस्कृती, अर्थविषयक, राजकीय, ऐतिहासिक, वैचारिक अशा विविध विषयांवर आधारित सुप्रसिद्ध लेखकांसह, नवोदित लेखकांची पुस्तके मांडण्यात आली आहेत. पुढील दोन दिवस (१८ आणि १९) सकाळी १० ते सायंकाळी ७ पर्यंत हे ग्रंथ विक्री प्रदर्शन राहणार आहे. राजधानीतील मराठी लोकांनी या ग्रंथ प्रदर्शनास भेट द्यावी, असे आवाहन महाराष्ट्र सदन आणि परिचय केंद्राकडून करण्यात येत आहे.

# वाहनांना ३० मार्चपूर्वी 'हाय सिक्युरिटी' नंबर प्लेट अनिवार्य

ठाणे : बनावट नंबर प्लेट लाऊन होणारे गुन्हे, रस्त्यावर धावणारे वाहन नेमके कोणाचे अशा विविध कारणांमुळे वाहनाच्या नंबर प्लेट वरून वाहनाची खरी ओळख पटविण्यासाठी मोठा अडथळा ठरतो आहे, यावर उकल म्हणून राज्य सरकारने सर्व वाहनांना हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसविणे अनिवार्य केलं आहे. ठाणे प्रादेशिक परिवहन विभागाने याबाबत कडक धोरण अवलंबले असून ३० मार्च २०२५ पर्यंत ठाण्यातील सर्व वाहनांच्या नंबर प्लेट या हाय सिक्युरिटी नंबर प्लेट असणे बंधनकारक रहाणार आहे.



व्यक्ती इतक्याच वाहनांची संख्या

ठाण्यात व्यक्ती इतक्याच वाहनांची संख्या असल्याचा आभास होतो. रस्त्यावर धावणारे वाहन नेमके कोणाचे हे देखील समजून येत नाही कधी नंबर प्लेट नसणारी किंवा खोट्या नंबर प्लेट लावून वाहने चालवणाऱ्यांची संख्या कमी नाही. मात्र अशा वाहनांचा कळत नकळत एखादा गुन्हा घडला, तर त्याला शोधणे खूप अवघड होऊन जाते. अशा नंबर प्लेट वरून राष्ट्रीय सुरक्षा देखील धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही. ठण्यसारखी परिस्थिती देशभरात असून याच पार्श्वभूमीवर मा. सर्वोच्च न्यायालयाने सर्व वाहनांना हाय सिक्युरिटी नंबर प्लेट लावण्याची सूचना केली आहे. या बाबत राज्य शासनाने सुरक्षेच्या दृष्टीने याची गंभीर दखल घेतली आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालयांना आपल्या अखत्यारीत येणाऱ्या सर्व वाहनांना ३० मार्च २०२५ पूर्वी हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसवून घेण्याचे आवाहन केले असल्याची माहिती ठाणे प्रादेशिक परिवहन अधिकारी हेमांगिनी पाटील यांनी दिली.

ठाण्यातील १ एप्रिल २०१९ पूर्वी जी वाहने आहेत अशा सर्व वाहनांना हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसवायची आहे. या कामासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयाने तीन अधिकृत कंपन्यांची नेमणूक केली आहे. अनधिकृत विक्रेत्याकडून अशी नंबर प्लेट बसवून घेतली

# अंबाजोगाई येथील व्यापारी हल्ला व लुट प्रकरणी २४ तासात आरोपींना बेड्या व १०० टक्के मुद्देमाल हस्तगत

बीड ।प्रतिनिधी

दिनांक १५/०१/२०२५ रोजी २०:३० ते २१:०० वाजेच्या दरम्यान अंबाजोगई शहरातील व्यापारी श्री. सुजित सोनी यांचेवर हल्ला करुन त्यांचे जवळील वन प्लस मोबाईल, एक सोन्याची अंगठी बळजबरीने हिसकावुन घेवुन गेल्याची घटना घडली होती. त्याबाबत पोलीस स्टेशन अंबाजोगई शहर येथे गु.र.नं. २६/२०२५ कलम ३११, ३ (५) भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेवुन पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत (भा.पो.से.) यांनी अंबाजोगई शहर पोलीस व स्थानिक गुन्हे शाखा यांना आरोपी शोध घेवुन गुन्हा उकल करण्याच्या सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक श्री. उस्मान शेख यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानीक गुन्हे शाखा येथील पोलीस उपनिरीक्षक श्री. सुशांत सुतळे यांचे नेतृत्वाखाली पथक तयार करुन गुन्ह्याचा समांतर तपास सुरु केला.

सदर गुन्ह्याचा तपास सुरु असतांना पोलीस उपनिरीक्षक श्री. सुशांत सुतळे स्था.गु.शा. हे त्यांच्या पथकासह सदर गुन्ह्याचा तपास करीत असतांना त्यांना सुमित सोनी यांचे दुकानात काम करणारा



अनिकेत महादेव मगर रा. महात्मा फुले नगर, अंबाजोगई याचेवर संशय आल्याने तपास पथकाने त्यास ताब्यात घेवुन घेवुन विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्याने सदरचा गुन्हा केल्याचे कबुल करुन त्याने सदरचा गुन्हा त्याचे साथीदार ।) तेजस अनिल तुरूकमारे रा. स्नेहनगर, अंबाजोगई २) कृष्णा दत्ता मुंडे रा. वडारवाडा, अंबाजोगई व त्यांचा एक अल्पवयीन साथीदार यांचेसह केल्याचे कबुल केले. त्यावरुन तपास पथकाने यातील आरोपींना ताब्यात घेवुन त्यांचेकडुन गुन्ह्यात चोरीस गेलेला १०,०००/- रुपये किंमतीचा वन प्लस मोबाईल, ५३,७६०/- रुपये किंमतीची ६ ग्रॅम ७२० मिली वजनाची सोन्याची अंगठी व गुन्ह्यात वापरलेली जुनी वापरती यामाहा कंपनीची ठ१५ मोटार सायकल असा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

सदर गुन्ह्याची उकल पोलीसांनी २४ तासाचे आत केली असुन यातील जखमी फिर्यादी श्री. सुजित सोनी हे झालेल्या घटनेनंतर घाबरलेले असल्याने त्यांना घटनास्थळ आठवत नव्हते. परंतु पोलीसांनी तांत्रीक तपास करुन घटनास्थळ निश्चीत केले. त्यानंतर जलदगतीने तपास करुन सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे.

# सेलू (परळी) येथील बालाजी माध्यमिक विद्यालयात आनंदनगरी कार्यक्रम संपन्न

परळी ।प्रतिनिधी

शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या मराठवाडा बहुउद्देशीय ग्रामीण विकास सेवाभावी संस्था परळी वैजनाथ संचलित बालाजी माध्यमिक विद्यालय सेलू (परळी) तालुका परळी वैजनाथ जिल्हा बीड येथे १७ जानेवारी रोजी आनंदनगरी मेळावा कार्यक्रम संपन्न झाला. आनंदनगरी मेळाव्याचे उदघाटन सेलू (परळी) ग्रामपंचायतचे सरपंच रामचंद्र (बाळू) व पंचायत समितीचे प्रशासकीय अधिकारी निळकंठ दराडे यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांनी मोबाईल वापरापासून व जंकफूड खाण्यापासून दूर राहावे तसेच विद्यालयातील अडीअडचणी सोडविण्यासाठी सर्व मदत व सहकार्य करण्यात येईल अशी ग्वाही सरपंच रामचंद्र (बाळू) फड यांनी दिली. आनंदनगरी मेळावा या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिकत असताना मेहनत आणि कमाईची भावना विकसित होते. शिक्षणानंतर विद्यार्थ्यांनी भविष्यात नोकरीपेक्षा व्यवसाय करण्याला प्राधान्य द्यावे, तसेच शाळेच्या कार्याचे कौतुक करत बालाजी विद्यालय हे आदर्श विध्यार्थी घडविणारी शाळा असल्याचे प्रतिपादन निळकंठ दराडे यांनी केले. मराठवाडा बहुउद्देशीय ग्रामीण विकास सेवाभावी संस्था परळी वैजनाथ संचलित बालाजी माध्यमिक विद्यालय सेलू (परळी) तालुका परळी वैजनाथ जिल्हा बीड येथे

## सरपंच रामचंद्र (बाळू) फड व निळकंठ दराडे यांच्या हस्ते उदघाट्न
## विद्यार्थ्यांनी मोबाईल पासून दूर राहावे - सरपंच रामचंद्र (बाळू) फड
## आदर्श विद्यार्थी घडविणारे ज्ञान मंदिर म्हणज बालाजी विद्यालय-निळकंठ दराडे



आज दिनांक १७/०१/२०२५ रोजी शाळेत आनंदनगरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष वैजनाथ गणपतराव चाटे सर उपस्थित होते तर कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून लोकनियुक्त कार्यतत्पर सरपंच रामचंद्र (बाळु) फड, परळी पंचायत समितीचे प्रशासकीय अधिकारी निळकंठ दराडे, अजय बळवंत, सेलू परळीचे उपसरपंच धम्मानंद बचाटे यांची उपस्थितीत होते. विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञान बरोबरच व्यवहारिक आणि आर्थिक बाबींचे ज्ञान ही मिळावे तसेच नफा-तोटा आणि दुकान लावून खरेदी विक्रीचे अनुभव, छोटे व्यवसाय कसे सुरु करायचे याची कुशलता विद्यार्थ्यांना कळावी यासाठी आनंदनगरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याचे प्रतिपादन वैजनाथ चाटे सर यांनी केले. आनंदनगरी मेळाव्यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. विविध ३० प्रकारचे खाद्यपदार्थ स्टॉल्स ज्यामध्ये स्वादिष्ट पाणीपुरी आणि विविध पुरी भाजी विद्यार्थ्यांनी सादर केले. दरम्यान संस्थेच्या सचिव महानंदा मुंडे यांची कन्या ज्योती आत्माराम मुंडे हीची शासकीय अभियंता महावितरण येथे नियुक्ती झाली त्याबद्दल शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी जि प प्राथमिक शाळा सेलू परळी चे शिक्षक दहिफळे मामा, शिक्षक महेश जाधव, सचिन फड, श्रीमती शिंदे मॅडम तसेच जि प प्राथमिक शाळा पावन प्रोटीनचे मुख्याध्यापक परोडवड सर, शाळेचे मुख्याध्यापक नामदेव मुंडे सर व शाळेतील सर्व विद्यार्थी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक नामदेव मुंडे यांनी केले तर सुत्र संचलन गित्ते सर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बालाजी माध्यमिक विद्यालय सेलू परळी येथील शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर व कर्मचारी यानी परीश्रम घेतली.

# मिल्लत उर्दू प्राथमिक शाळेत खरी कमाई उपक्रम उत्साहात संपन्न




बीड ।प्रतिनिधी

शहरातील नामांकित मिल्लत उर्दू प्राथमिक शाळेत, खरी कमाई हा उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी सहभागी होत विविध खाद्यपदार्थ विक्री करुन प्रत्यक्ष व्यवहारीक ज्ञानाच अनुभव घेतला. यावेळी अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या व्यवहारीक चातुर्याचे कौतुक केले.विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानासह व्यवहारीक ज्ञानाचे अनुभव मिळावे, त्यांच्यातील सुप्त व्यसायीक गुणांना वाव मिळावा या हेतूने खरी कमाई उपक्रमाचे गुरुवार (दि.१६) सकाळी आयोजन करण्यात आले होते. याचे उद्घाटन पिपल्स उर्दू प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक सय्यद अतिक सर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी

सज्जाद खान सर, मिल्लत ग्रुप ऑफ स्कूल्सचे सचिव व दैनिक मिल्लत मित्रचे संपादक उमैर सलीम सर, माजी नगरपरिषद सभापती खुर्शीद आलम , दैनिक अल्हीलाल टाइम्सचे खमरूल इमान खान, डॉ. इकबाल, उर्दू शाळेचे सचिव अब्दुल समद सर, पीपल्स उर्दू माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक शाहीद सर, मिल्लत उर्दू शाळेचे मुख्याध्यापक जाहिद हुसेन सर, युसुफ अब्दुल रहीम साहब, मिल्लत इंग्लिश शाळेचे मुख्याध्यापिका आफरीन मिस यांची प्रमुख उपस्थिती होती. या खरी कमाई उपक्रमात अनेक विद्यार्थ्यांनी सहभागी होत विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल लावून विक्री केली. यावेळी त्यांनी या विक्रीतून व्यवसायातून कमाई करीत प्रत्यक्ष व्यवहारीक अनुभव घेतला. आपले व्यसायीक सुप्त गुण दाखवून दिले. मान्यवर मंडळी यांनी सर्व स्टॉलला भेटी देत खरेदी करीत मुलांच्या आनंदात सहभागी झाले. यावेळी विद्यार्थ्यांचे व्यवहारीक चातुर्य पाहून त्यांचे कौतुक केले. या खरी कमाई उपक्रमासाठी पालकांनीही मोठ्या प्रमाणात उपस्थिती लावली होती.हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. येणाऱ्या मान्यवरांचे संस्थेचे सचिव उमेर सलीम यांनी स्वागत केले.

# दरवर्षी अर्थसंकलपाच्या ५ टक्के दिव्यांग निधीचे वाटप कित्येक

## निवेदन देवूनही अमलबजावणी न झाल्याने अमरण उपोषणास बसणार

गेवराई ।प्रतिनिधी

शेख राजु शहराध्यक्ष, प्रहार जनशक्ति पक्ष, व दिव्यांग, अंपग रा. गेवराई निवेदना द्वारे मागणी करण्यात आली दिव्यांगांना आपल्या कार्यालयाच्या वतीने दरवर्षी अर्थसंकलपाच्या ५ टक्के निधी दिव्यांगांना समप्रमाणात देण्यात यावे करिता शासनाचे धोरणाप्रमाणे म्हणजे दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, शासन निर्णय २०१६ प्रमाणे व इतर निर्णयाप्रमाणे वाटप न करता काही वर्ष २०१७-१८ मध्ये ८० लाभार्थ्यांना ५०००/-रुपये प्रमाणे २०१८-१९मध्ये ४५ दिव्यांगांना ५०००/-रुपये प्रमाणे २०१९-२० मध्ये ३४ दिव्यांगांना ५०००/-रुपये प्रमाणे, २०२०- २१ मध्ये २२ दिव्यांगांना ५,००० रुपये प्रमाणे, २०२१-२२ मध्ये २०२ दिव्यांगांना १०००/-रुपये प्रमाणे, २०२२-२३ मध्ये आपल्या माहितीप्रमाणे देण्यात आलेले नाही. निरंक



देण्यात आले आहे. २०२३-२४ मध्ये २५० दिव्यांगांना २०००/- रुपये प्रमाणे वाटप करण्यात आले आहे. ते वाटप सरसकट न करता तसेच शासनाच्या धोरणाप्रमाणे देण्यात आलेला नाही. वार्षिक अर्थसंकल्प ५ टक्केच्या प्रमाणे वाटप करण्याचे शासन अध्यादेश असतांना वाटप करण्यात आले आहे. आपल्याला वारंवार विनंती, निवेदने देवूनही आमच्या दिव्यांगावरील अन्यायाला व आमच्या हक्काच्या तसेच कायदेशिर मागणीचा विचार केला नाही, नाईलाजास्तव आपल्या कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने अमरण उपोषणास २६ जानेवारी २०२५ रोजी अपंग सोबत बसत आहोत.

# डिजिटल मीडिया परिषदेच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी सहभागी व्हावे - प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे

## सेलु येथे पुरस्कार वितरण सोहळा

पुणे ।प्रतिनिधी

मराठी पत्रकार परिषद आयोजित आदर्श जिल्हा व तालुका पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळा आणि भव्य राज्यस्तरीय मेळाव्याचे आयोजन येत्या १ फेब्रुवारी २०२५ रोजी सेलू या ठिकाणी करण्यात आले असून या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्यातील डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हा व तालुका पदाधिकारी आणि सदस्यांनी आवर्जून उपस्थित रहावे.असे आवाहन डिजिटल मीडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी केले आहे.



मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख सर यांच्या आदेशानुसार व परिषदेचे विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर सह राज्यस्तरीय पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली परिषदेच्या वतीने प्रत्येक वर्षी महाराष्ट्र राज्यातील आदर्श जिल्हा व तालुका पत्रकार संघांना यथोचित सन्मान करून राज्यातील प्रमुख मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराने गौरविले जाते. या वर्षी देखील परभणी जिल्ह्यातल्या सेलू या तालुका ठिकाणच्या शहरामध्ये हा भव्य सोहळा येत्या एक १ फेब्रुवारी २०२५ रोजी होत आहे. मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त माननीय श्री.एस.एम. देशमुख यांनी काही दिवसांपूर्वीच या ठिकाणी भेट देऊन सेलु पत्रकार संघाची बैठक घेत पदाधिकाऱ्यांकडून आढावा घेतला. या आढावा बैठकीसाठी आम्ही स्वतः उपस्थित होतो. हा भव्य पुरस्कार वितरण सोहळा व राज्यस्तरीय मेळावा फक्त एक दिवसाचा असणार आहे. राज्यभरातुन मुक्कामी येणाऱ्या पत्रकार बांधवांच्या निवासस्थानाची व भोजनाची व्यवस्था सेलु तालुका पत्रकार संघाकडून करण्यात आली आहे. मराठी पत्रकार परिषदेशी संलग्न असलेली ही डिजिटल मिडिया परिषद आहे. महाराष्ट्र राज्यातील डिजिटल मिडिया परिषदेच्या जिल्हा आणि तालुका पदाधिकारी व सदस्यांनी या मेळाव्यात सहभागी होणे बंधनकारक आहे. डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष संतोष शिंदे,उपाध्यक्ष

अनिल उंबरकर, प्रदेश सदस्य अनिल धुपदाळे कोल्हापूर ,प्रदेश सदस्य जितेंद्र सिरसाठ बीड मराठवाडा,प्रदेश सदस्य तानाजी जाधव सांगली, प्रदेश सदस्य मल्हार पवार कर्जत रायगड, प्रदेश सदस्य शेख अफताब अहिल्याबाईनगर या सर्व राज्यस्तरीय पदाधिकारी यांनी जबाबदारी घ्यावी.आपणास व इतर पदाधिकारी यांचे काही म्हणणे असल्यास आम्हाला ९८२२५४८६९६ या मोबाईल नंबर वर संपर्क साधावा असे आवाहनही डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी केले आहे.

# पाझर तलावात विनापरवाना पाण्याच्या मोटारी टाकल्यास कारवाई करण्यात येईल

## धावज्याची वाडी , तांदळ्याची वाडी येथील पाझर तलावास भेट देऊन तहसीलदार शेळके यांचे आवाहन

बुधवार १५ जानेवारी रोजी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी धावज्याची वाडी येथील तलावास भेट दिली . यावेळी त्यांनी वरील प्रमाणे आवाहन केले . बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी व बीडच्या उपविगीय अधिकारी कविता जाधव यांच्या समन्वयाने सदरची भेट दिली, असे तहसीलदार यांनी सांगितले . धावज्याची वाडीच्या सरपंच सोनाली काटकर यांनी तहसीलदार यांना पत्र लिहून या पाझर तलावात धावज्याची वाडी , खर्डेवाडी, तांदळ्याची वाडी या गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरी असून तलावाच्या आजूबाजूचे शेतकरी विनापरवाना तलावात मोटारी टाकुन उपसा करत आहेत , अशा प्रकारची तक्रार दिली होती . विनापरवाना पाण्याचा उपसा होऊ नये , उन्हाळ्यात पाणीटंचाई निर्माण होऊ नये यासाठी स्वतः भेट देण्याची विनंती त्यांनी केली होती . त्या अनुषंगाने तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी मंडळ अधिकारी दिपाली आघाव , तलाठी अमोल आधापुरे यांच्यासह धावज्याची वाडी येथील नागरिक , माजी सरपंच महेंद्र काटकर , उपसरपंच विष्णू सांगळे , ग्रामपंचायत सदस्य संजीवन काटे , ग्रामसेवक एन डी सुरवसे , विलास काटे , बंडू तांदळे , उमेश तांदळे , श्रीराम तांदळे , प्रदीप काटे, चक्रधर भोसले , लाईनमन पांडुरंग घरत , चंद्रसेन तांदळे , प्रभू सानप यांच्यासह भेट दिली .

भेटी दरम्यान शेळके यांच्या निदर्शनास आले की आजूबाजूचे काही



शेतकरी तलावाच्या क्षेत्रात पाण्याच्या मोटरी टाकण्याच्या तयारीत आहेत . तहसीलदारांनी आजूबाजूच्या सर्व शेतकऱ्यांना बोलवून समज दिली की विनापरवाना जर कोणी पाण्याची मोटर टाकली आणि त्यामुळे पाणीटंचाई निर्माण झाली तर त्यांच्यावर संबंधित विभागामार्फत कार्यवाही करण्यात येईल. उपस्थित शेतकऱ्यांनी सुद्धा आम्ही विनापरवाना अशा प्रकारे पाण्याची मोटर टाकणार नाही, अशी ग्वाही दिली . उपस्थित लाईनमन यांना तहसीलदार यांनी स्पष्ट सूचना दिल्या की कोणालाही विनापरवाना वीज जोडणी देऊ नये . जर कोणी विनापरवाना वीजजोडणी घेतली तर त्यांच्यावर तात्काळ कार्यवाही करावी कारवाई करावी .

यावेळी बोलताना तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी असेही सांगितले की शेतकऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नाबाबत जिल्हाधिकारी अविनाश पाठक हे अत्यंत सजग आहेत . दुष्काळ अनुदान यादी असो अथवा रस्त्याचे प्रश्न असो सर्वांचे प्रश्न प्राधान्याने सोडविण्याचा प्रशासनाचा मानस आहे , असे जिल्हाधिकारी नेहमी नमूद करत असतात . सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीच्या अनुषंगाने जिल्हाभरात बाधित शेतकऱ्यांच्या याद्या अपलोड कार्य करण्याची कार्यवाही सुरू असून लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यावर अनुदान जमा होईल याबाबत निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी आजच आढावा घेतल्याचे तहसीलदार म्हटले .

सार्वजनिक पाण्याच्या स्त्रोतावरून गावोगावी पाण्याची व्यवस्था करण्यात येते त्यासाठी अशा ठिकाणी विहिरी खोदल्या जातात . आजूबाजूच्या शेतकऱ्यांनी विनापरवाना पाणी उपसा केला नाही तर उन्हाळ्यात पाणीटंचाई जाणवणार नाही आणि टँकर लावावे लागणार नाहीत . यासाठी सर्वांनीच प्रशासनाला मदत करणे आवश्यक असल्याचे तलाठी अमोल अधापुरे यांनी यावेळी नमूद केले . तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी बीड तालुक्याचा पदभार घेतल्यापासून शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत त्यांनी संवेदनशीलता दाखविली आहे . त्यामुळे ते सर्वांना आपलेसे तहसीलदार वाटू लागले आहेत .

# शारीरिक आणि मानसिक तंदुरुस्तीसाठी खेळाचे महत्त्व अनन्य साधारण आहे : जिल्हाधिकारी अविनाश पाठक










बीड येथे जिल्हा क्रीडा संकुलात महसूल विभागाच्या जिल्हास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांच्या उद्घाटनाप्रसंगी जिल्हाधिकारी शुक्रवारी ( दिनांक १७ रोजी ) बोलत होते . महसूल विभागामार्फत विभागीय स्तरावर जालना येथे १६ , १७ व १८ फेब्रुवारी रोजी स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले आहे . या स्पर्धांमध्ये उत्कृष्ट खेळाडूंची निवड व्हावी , खेळाडूंचा परिचय व्हावा या उद्देशाने जिल्हास्तरीय महसूल क्रीडा स्पर्धा दिनांक १७ व १८ जानेवारी दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या आहेत .

यावेळी अपर जिल्हाधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , अंबाजोगाईचे अपर जिल्हाधिकारी अरविंद लाटकर , उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी , उपजिल्हाधिकारी ओंकार देशमुख , अंबाजोगाईचे उपविभागीय अधिकारी दीपक वांजळे , बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव , आष्टी पाटोद्याच्या उपविभागीय अधिकारी सीमा शेख यांच्यासह तहसीलदार चंद्रकांत शेळके , नरेंद्र कुलकर्णी , अविनाश शिंगटे , संदीप खोमणे , संतोष रुईकर , दत्ता निलावाड , राकेश गिड्डे , वैशाली पाटील , विलास तरंगे , सुरेश घोळवे , वैभव महिंद्रकर यांच्यासह त्यांचे अधिनस्त नायब तहसीलदार , अव्वल कारकून , महसूल सहाय्यक , मंडळ अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी , ग्राम महसूल सेवक यांच्यासह वाहन चालक , शिपाई इत्यादी उपस्थित होते .

सर्वप्रथम दिपप्रज्वलन झाले . त्यांनतर निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रास्ताविक केले . त्यांनी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली आपण सर्वजण अनेक क्रीडा प्रकारांची तयारी करत आहोत , आणि विभागीय स्तरावर आपल्या जिल्ह्याला निश्चितच प्रथम क्रमांकावर आणण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे , असे आवाहन केले . खेळाडूंसाठी जिल्हास्तरावरच राहण्याची व जेवणाची व्यवस्था करण्यात आलेली आहे . त्यामुळे खेळाडूंनी पूर्ण क्षमतेने सराव करावा आणि जिल्ह्यासाठी जास्तीत जास्त योगदान द्यावे असे आवाहन त्यांनी केले .

अध्यक्षीय भाषणात बोलताना जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी घोषित केले की औपचारिक रित्या स्पर्धांचे उद्घाटन झालेले आहे . सर्व क्रीडा प्रकारांमध्ये अधिकारी, कर्मचारी यांनी हिरीरीने भाग घ्यावा , सराव करावा , संस्कृतिक स्पर्धेत भाग घेतलेल्यांनी आपल्या जिल्ह्याचे नाव पुढे कसे येईल यासाठी पुरेपूर प्रयत्न करावेत असे नमूद केले .

जीवनात खेळाचे काय महत्त्व आहे याबद्दल बोलताना जिल्हाधिकारी म्हटले की आपल्या दैनंदिन जीवनात खेळाचे महत्व अनन्यसाधारण आहे . खेळ हा मनुष्याच्या जीवनातील एक महत्वपूर्ण अंग असून खेळांमुळे शारीरिक आणि मानसिक फायदेही होतात . प्रत्येकाला उत्तम मानसिक आणि शारीरिक स्वास्थ्यासाठी खेळाव्यतिरिक्त दुसरा पर्याय नाही . खेळल्यामुळे शारीरिक विकास साधतो व मानसिकता प्रबळ बनते . खेळ ही एक शारीरिक कला आहे . दररोज किमान अर्धा ते एक तास खेळ खेळला पाहिजे .

तहसीलदार व नायब तहसीलदार संघटनेचे जिल्हाध्यक्ष तसेच बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी अधिकची माहिती देताना सांगितले की तालुकास्तरीय तहसील कार्यालय किंवा जिल्हास्तरीय जिल्हाधिकारी कार्यालयातील कार्यरत सर्व खेळाडूंना पुरेशा सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत . जिल्हास्तरावर तसेच विभागीय स्तरावर पुरुषांसाठी खो-खो , कबड्डी , क्रिकेट , हॉलीबॉल , फुटबॉल ,पोहणे इत्यादी क्रीडा प्रकार असून महिलांसाठी खो खो , क्रिकेट , थ्रो बॉल , रिंग टेनिस , एकेरी व दुहेरी इत्यादी क्रीडा प्रकार आहेत . याशिवाय उंच उडी , कॅरम , बुद्धिबळ , टेनिस , बॅडमिंटन , टेबलटेनिस , लॉन टेनिस हे क्रीडा प्रकार एकेरी , दुहेरी व मिश्र या स्वरूपात आहेत . ४५ वर्षाखालील वयोगटासाठी आणि ४५ वर्षावरील वयोगटासाठी स्पर्धा वेगवेगळ्या असणार आहेत . पुढे बोलतांना शेळके म्हटले की क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी झाल्यामुळे व खेळांमुळे नवा उत्साह, जोम शरीरात संचारतो आणि त्याचा फायदा दैनंदिन कामकाजात होतो . जनतेच्या सेवेसाठीही सकारात्मक प्रवृत्ती वाढीस लागते असे त्यांनी सांगितले . पोहणे या क्रीडा प्रकारासाठी क्रीडा संकुलातच उपलब्ध असलेल्या जलतरण तलवात सराव केला जाणार आहे असे त्यांनी सांगितले .

उद्घाटन समारंभाच्या या कार्यक्रमास मध्यवर्ती संघटनेचे अध्यक्ष बाबा बडे , महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटना मुंबईचे सल्लागार सुहास हजारे , तलाठी संघटनेचे अध्यक्ष परमेश्वर राख , महसूल कर्मचारी संघटना बीडचे अध्यक्ष महादेव चौरे , तलाठी संघटनेचे अध्यक्ष दादासाहेब शेळके , गट क महसूल कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष संजय हंगे , वाहन चालक संघटनेचे अध्यक्ष बापू वाघमारे , शिपाई संघटनेचे अध्यक्ष गोटीराम गोरेल , कोतवाल संघटनेचे अध्यक्ष अरविंद राऊत इत्यादी हजर होते . या सर्वांनी या स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या .

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तहसीलदार सुरेश घोळवे यांनी केले तर आभार प्रदर्शन तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी केले . यानंतर लगेचच उद्घाटनपर क्रिकेटचा सामना घेण्यात आला . त्याचा टॉस जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या हस्ते करण्यात आला . आपल्या दैनंदिन व्यापातून मुक्त होऊन स्वच्छंदपणे विविध क्रीडा प्रकारांचा आस्वाद घेताना महसूल विभागाचे अधिकारी व कर्मचारी यावेळी दिसून आले .

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

# महायुतीत तणाव वाढतोय, बीड जिल्ह्यातील प्रकरणावरून शिंदे गटाच्या मंत्र्याचं मोठं विधान

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर रोजी अपहरण करून हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली होती. या घटनेनंतर महाराष्ट्रात मोठी खळबळ उडाली. या घटनेवरून सर्वच क्षेत्रातून संतप्त प्रतिक्रिया उमटल्या. विधानसभेच्या सभागृहातही या घटनेवरून विरोधकांनी आवाज उठवला होता. दरम्यान, संतोष देशमुख हत्या प्रकरणात पोलिसांनी आरोपीला अटक केलं. मात्र, अद्यापही एक आरोपी फरार आहे. तसेच खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराडसह हत्या प्रकरणातील आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली. मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आल्यानंतर एसआयटीने वाल्मिक कराडला ताब्यात घेतलं असून पुढील तपास सुरु आहे.

सध्या वाल्मिक कराडला न्यायालयाने २२ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी दिलेली आहे. दुसरीकडे संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मिक कराडचा सहभाग असल्याचा आरोप विरोधक करत आहेत. तसेच वाल्मिक कराड हा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते तथा मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय असल्याचा आरोप करण्यात येत आहे. त्यामुळे धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी विरोधकांकडून केली जात आहे. यावरून सत्ताधारी आणि विरोधक आमने-सामने आले आहेत. संतोष देशमुख हत्या प्रकरणात



भारतीय जनता पक्षाचे आमदार सुरेश धस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे खासदार बजरंग सोनवणे व आमदार संदीप क्षीरसागर यांनी आवाज उठवला.

तसेच राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यात संतोष देशमुख हत्येच्या घटनेच्या निषेधार्थ निघालेल्या मोर्चात नेत्यांनी आरोप-प्रत्यारोप केल्यामुळे बीड जिल्ह्यातील राजकारण चांगलंच तापलं. त्यामुळे बीड जिल्हा चांगलाच चर्चेत आहे. दरम्यान, बीड जिल्ह्यातील प्रकरणावरून महायुतीत तणाव वाढत असल्याचं मोठं विधान शिवसेना शिंदे गटाचे नेते तथा मंत्री संजय शिरसाट यांनी केलं. ते साम टिव्ही या वृत्तवाहीनीशी बोलत होते.

संजय शिरसाट काय म्हणाले?

बीड जिल्ह्यातील स्थानिक राजकारण आहे. तेथील राजकारणावर जेवढं बोलावं तेवढं कमी आहे. मात्र, आम्ही स्पष्टपणे सांगितलेलं आहे की ज्या-ज्या पक्षाचे नेते आहेत, त्या पक्षाच्या नेत्यांनी त्या संदर्भात निर्णय घ्यायचा आहे. आता धनंजय मुंडे यांच्याबाबत काय करायचं? ते उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ठरवायचं आहे, तसेच आमदार सुरेश धस यांच्याबाबत काय करायचं ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठरवायचं. आम्ही त्या संदर्भातील निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत नाहीत. आता ते (मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार) वरिष्ठ नेते आहेत त्यामुळे त्यांनी निर्णय घ्यायचा आहे आणि ते जो निर्णय घेतील तो आम्हाला मान्य असेल, असं संजय शिरसाट यांनी म्हटलं आहे.

बीड जिल्ह्यात दररोज जी बॅटिंग सुरु आहे, दररोज एकमेकांच्या विरोधात आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत, त्यामुळे बीड जिल्ह्यात तणाव वाढत आहे आणि हे सत्य आहे. त्यामुळे महायुतीत निश्चित तणाव वाढतोय. पण काय करणार? कारण एक भारतीय जनता पक्षाचे आमदार आहेत आणि एक राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे आमदार आहेत. मात्र, तणाव वाढतोय, याची जाणीव सर्वांनी ठेवली पाहिजे, असं मंत्री संजय शिरसाट यांनी म्हटलं आहे.

## सेलूत उत्कृष्ट दर्जाचे क्रिकेट स्टेडीयम उभारणार-राज्यमंत्री मेघना बोर्डीकर



सेलू (प्रतिनिधी)

मराठवाड्यातील सूसज्ज दर्जाच क्रिकेट स्टेडीयम उभारणार असल्याचे प्रतिपादन राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी शुक्रवार १७ रोजी स्व.नितिन लहाने चषक क्रिकेट स्पर्धेला भेट प्रसंगी केले.यावेळी स्व.नितिन लहाने कला व क्रिडा मंडळाचे अध्यक्ष माजी आमदार हरिभाऊ लहाने,सचिव संदिप लहाने,डॉ.संजय रोडगे ,भाजपा तालूकाध्यक्ष दत्तराव कदम,भाजपा शहराध्यक्ष अशोक अंभोरे,कपिल फूलारी,शिवहरी शेवाळे,अशोक सेलवाडीकर,पांडूरंग गजमल,पोलीस उपनिरिक्षक माधव लोकूलवार,भागवत दळवे,बाबा काटकर,अविनाश शेरे,पांडूरंग कावळे,गजानन गात आदींची उपस्थीती होती.शहरात स्व.नितिन लहाने कला व क्रिडा मंडळाच्यावतिने निमंत्रितांच्या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन मागील २५ वर्षापासून करण्यात असून स्पर्धेचे हे रौप्य महोत्सवी वर्ष आहे. या स्पर्धेस राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी सदिच्छा भेट देवून स्पर्धेस शूभेच्छा दिल्या तसेच पूढे बोलतांना राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर म्हणाल्या की,महाराष्ट्र क्रिकेट असोसियशन सोबत चर्चा करून सेलू शहरात माजी उपनगराध्यक्ष संदिप लहाने हे स्टेडियमसाठी जागा उपलब्ध करणार असल्याने मराठवाड्यातील सूसज्ज क्रिकेटचे स्टेडियम उभारूण जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू तयार होण्यास मदत होईल.

## भारत सरकारच्या नोटरी पदी अँड राहुलकुमार सुरेशचंद्र राका यांची नियुक्ती

गेवराई ।प्रतिनिधी

गेवराई येथील दिवाणी व फौजदारी न्यायालय येथील व भारतीय जनता पार्टीचे प्रांत सदस्य सुरेश भाऊ राका यांचे चिरंजीव अँड राहुलकुमार राका यांची भारत सरकारच्या नोटरी पदी नियुक्ती झाली.भारत सरकारने विधी व न्याय विभागाने सन २०२१ मध्ये नोटरी पब्लिकची जाहिरात काढून वकील उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले होते. राज्यातील वकील उमेदवार यांच्याकडून अर्ज प्राप्त झाल्यानंतर पात्र उमेदवारांच्या २०२३ मध्ये मुलाखती घेण्यात आल्या होत्या २०२५ ला जानेवारी मध्ये सदर नोटरी पदाकरता भाजपाचे ज्येष्ठ नेते मा. प्रांत सदस्य सुरेश भाऊ राका यांचे चिरंजीव भाजपा सरचिटणीस तथा दि वैद्यनाथ बँक सल्लागार व दैनिक बीड वास्तव चे उपसंपादक अँड राहुलकुमार राका यांनी विधी व न्याय विभाग दिल्ली यांच्याकडे अर्ज केला होता. यामध्ये पात्र ठरून त्यांची संबंधित विधी व न्याय विभागाकडून मुलाखत घेण्यात आली होती सदर मुलाखतीमध्ये यश मिळाल्यानंतर ड राहुलकुमार सुरेशचंद्र राका यांची भारत



सरकारच्या पब्लिक नोटरी पदी निवड झाली आहे. ड राहुलकुमार राका २००९ मध्यें वकिली परीक्षा पास झाले होते . त्यांच्या या निवडीबद्दल हिंदुस्तानचे पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी ,विधी व न्याय मंत्री अर्जुन राम मेघवालजी , रस्ते व वाहतूक मंत्री श्री .नितीनजी गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखरजी बावनकुळे, माजी मंत्री आ.सुधीरभाऊ मुनगंटीवार,पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई गोपीनाथराव मुंडे, दबंग माजी खासदार डॉ. प्रितम ताई गोपीनाथराव मुंडे, माजी अर्थराज्यमंत्री भागवत कराड, माजी रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, दिल्ली येथील स्वीय सहाय्यक नायर साहेब, परळी येथील स्विस सहाय्यक लोढाजी भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष नोटरी ड संगीताताई धसे , गेवराई न्यायालयातील नोटरी ड विलासराव पाटील यांचे नोटरी कामी सहकार्य व शिफारस पत्र दिल्याबद्दल नवनियुक्त नोटरी अँड राहुलकुमार सुरेशचंद्र राका यांनी वरील सर्वांचे आभार व्यक्त केले. त्यांच्या या निवडीबद्दल डॉक्टर , संभाजीनगर -बीड- गेवराई येथील वकील मंडळी व पत्रकार मित्र भाजपा-भाजयुमो मित्र व सर्व पक्षातील संघटनेतील मित्रपरिवाराने पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत . लवकरच भारत सरकार नोटरीचे सुसज्ज कार्यालय तहसील परिसरात जुने गेट समोर जनतेच्या सेवेकरता उघडण्यात येणार व दर्जेदार सेवा देणार असल्याची माहिती संबंधित प्रतिनिधीशी बोलताना दिली व सर्वांचे आभार व्यक्त केले.

# एसटी महामंडळाची नव्या बस खरेदीची पंचवार्षिक योजना

## दरवर्षी पाच हजार गाड्या खरेदी करणार

मुंबई (प्रतिनिधी)

एस. टी महामंडळ दरवर्षी स्वमालकीच्या पाच हजार साध्या लालपरी बसेस खरेदी करणार आहे. यासाठी महामंडळ पंचवार्षिक नियोजन करणार आहे, तसेच महामंडळात यापुढे कुठल्याही पद्धतीने भाडेतत्त्वावर बसेस न घेण्याचा महत्त्वपूर्ण निर्णयही परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी घेतला. परिवहन आयुक्त कार्यालयात एसटी महामंडळ कामकाज आढावा बैठक परिवहन मंत्री सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली. बैठकीस एस टी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर यांच्यासह सर्व



विभाग प्रमुख उपस्थित होते.

परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले, नवीन बस खरेदीचा करताना पुढील पाच वर्षात स्क्रॅपिंग (प्रवासी सेवेतून बाद होणाऱ्या)होणाऱ्या बसेसचा विचार करण्यात यावा. याबाबत सर्वांगीण अभ्यास करून पंचवार्षिक योजना आणावी. एस. टी. महामंडळात इलेक्ट्रिक बसेस घेण्यात येत आहे. यासाठी प्रत्येक आगारामध्ये चार्जिंग स्टेशन प्राधान्याने उभारण्यात यावे. महामंडळाने उत्पन्न वाढीसाठी पूरक योजना आणाव्यात. कर्मचाऱ्यांचे वेतन प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेपर्यंत देण्याची काळजी घेण्यात यावी. पगाराला कुठल्याही परिस्थितीत उशीर होता कामा नये. शासनाकडून महामंडळाला मिळणारा निधी आगाऊ स्वरूपात मिळण्यासाठी प्रस्ताव तयार करण्याच्या सूचनाही दिल्या.

परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले, एसटी महामंडळाने नवीन जाहिरात धोरण आणावे. नवीन येणाऱ्या बसेसवर दोन्ही बाजूला आणि मागील बाजूस अशा तीनही बाजूला डिजिटल जाहिरातीची व्यवस्था असावी. जाहिरात धोरणासाठी अन्य बाबी तपासून यामधून मिळणारे उत्पन्न १०० कोटीपर्यंत आणण्याचे उद्दिष्टही ठेवण्यात यावे. महामंडळाच्या बसेसला राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या रस्त्यांवर टोल माफी मिळण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात यावा. तसेच डिझेलवरील व्हॅटमध्ये सवलत देण्यासाठी राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा.एस टी महामंडळाच्या प्रत्येक डेपोमध्ये डिझेल पंप आहे. आता व्यावसायिक दृष्टिकोनातून उपयोगी ठरतील

# बारामती हादरली, पोलिसांकडून मोठा खुलासा, ९ वर्षाच्या मुलाला बापानेच, तिघांवर गुन्हा दाखल

**बारामती तालुक्यातील होळ येथे, नऊ वर्षीय पियुष भंडलकर याचा त्याच्या वडिलांनीच अभ्यास करत नाही म्हणून हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली. वडिलांनी रागाच्या भरात मुलाचे डोकं भिंतीवर आपटून आणि गळा दाबून खून केला. आजी आणि आणखी एका नातेवाईकांनी ही घटना दडवण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तीनही आरोपींना अटक केली आहे. ही घटना १४ जानेवारीला घडली असून, वडगाव निंबाळकर पोलिसांनी तपास करून गुन्हा उघड केला.**

बारामती तालुक्यातील होळ येथील पियुष विजय भंडलकर या नऊ वर्षीय बालकाचा त्याच्याच वडिलांनी मुलगा अभ्यास करत नाही म्हणून रागाच्या भरात भिंतीवर डोकं आपटून आणि गळा दाबून त्याचा खून केलाय. संबंधित घटना ही १४ जानेवारीला दुपारी अडीच वाजता राहत्या घरी घडल्याची माहिती आहे. त्यानंतर हा सर्व प्रकार दडवण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र वडगाव निंबाळकर पोलिसांनी या खुनाचं रहस्य उलगडत वडील विजय गणेश भंडलकर, मयत पियुषची आजी शालन गणेश भंडलकर आणि संतोष सोमनाथ भंडलकर या तिघांवर वडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




आजीकडून घटना दडपण्याचा प्रयत्न, दिली खोटी माहिती

वडील विजय भंडलकर यांनी मुलगा पियुष याला तू अभ्यास करत नाही, सारखा बाहेर खेळत असतो, तू तुझ्या आईच्या वळणावर जावून माझी इज्जत घालवणारा दिसतोय, असे म्हणत त्याला हाताने मारहाण केली. राग अनावर झाला अन् त्यांनी त्याचा गळा दाबून त्याला भिंतीवर आपटले यात त्याचा मृत्य झाला. पियुष याची आजी हे सर्व पाहत होती. पण तिने मुलगा विजयला अडवलं नाही. त्यानंतर विजय याच्या सांगण्याप्रमाणे पियुष हा चक्कर येवून पडला आहे, अशी खोटी माहितीही तिने दिली.

मुलगा चक्कर येवून पडल्याचा बनाव.

संतोष भंडलकर याने डॉ. भट्टड यांच्या दवाखान्यात पियुषला नेल्यानंतर तिथे विजय याच्या सांगण्यावरून पियुष हा चक्कर येवून पडल्याची खोटी माहिती दिली. डॉक्टरांनी पियुष याला होळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात घेवून जाण्याचा सल्ला दिला. मात्र तिथे न नेता आणि मयताबाबत गावातील पोलीस पाटील अथवा इतर कोणालाही काहीही न सांगत नातेवाईकांना बोलावून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मयताचे शवविच्छेदन न करता थेट अत्यंविधीची तयारी केली. पोलिसांना खबऱ्याकडून ही माहिती समजताच पोलिसांनी अंत्यविधी थांबवत पियुष याचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी बारामतीला नेला आणि त्यानंतर तपासात बापानेच पियुषची हत्या केल्याचं समोर आलं आहे.

## बीड जिल्ह्यात चाललंय तरी काय?

# आष्टीमध्ये सशस्त्र हल्ल्यात २ सख्ख्या भावांचा मृत्यू

आष्टी ।प्रतिनिधी

तालुक्यातील वाहिरा येथे गुरूवारी रात्री दहाच्या दरम्यान तीन सख्खा भावांवर त्याच्याच समाजातील काही लोकांना लोंखडी रॉड, धारदार शस्त्राने हल्ला केला. या हल्ल्यात दोन सख्खा भावांचा जागीच मृत्यू झाला. तर अन्य एक भाऊ गंभीर जखमी झाल्याची घटना अंभोरा पोलिस ठाणे हद्दीत घडली.अजय विलास भोसले,भरत विलास भोसले असे मयताचे नावे असून कृष्णा विलास भोसले हा गंभीर जखमी आहे.




आष्टी तालुक्यातील हातोळण येथील अजय विलास भोसले, भरत विलास भोसले, कृष्णा विलास भोसले हे तिघे भाऊ वाहिरा येथे गुरूवारी आले होते. याच ठिकाणी वाहिरा गावातील व बाहेरील काही लोक जमा झाले होते.गुरूवारी दुपारपासून हे सगळे याच ठिकाणी होते.रात्री साडे नऊ ते दहाच्या दरम्यान यातील काही लोकांनी या तीनही भावांवर लोंखडी रॉड, धारदार शस्त्राने हल्ला चढवला. या हल्ल्यात अजय विलास भोसले, भरत विलास भोसले या दोन सख्खा भावांचा जागीच मृत्यू झाला. तर तिसरा भाऊ कृष्णा विलास भोसले हा गंभीर जखमी झाला. असून त्याच्यावर अहिल्यानगर येथे उपचार सुरू आहेत. या घटनतेली सात संशयित आरोपीना अंभोरा पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.हा खून का व कोणत्या कारणावरुन केला हे अद्याप समजले नाही.

# अंबाजोगाई येथील व्यापारी हल्ला व लुट प्रकरणी २४ तासात आरोपींना बेड्या

दिनांक १५/०१/२०२५ रोजी २०:३० ते २१:०० वाजेच्या दरम्यान अंबाजोगाई शहरातील व्यापारी श्री. सुजित सोनी यांचेवर हल्ला करुन त्यांचेजवळील वन प्लस मोबाईल, एक सोन्याची अंगठी बळजबरीने हिसकावुन घेवुन गेल्याची घटना घडली होती. त्याबाबत पोलीस स्टेशन अंबाजोगाई शहर येथे गु.र.नं. २६/२०२५ कलम ३११, ३ (५) भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेवुन पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत (भा.पो.से.) यांनी अंबाजोगाई शहर पोलीस व स्थानिक गुन्हे शाखा यांना आरोपी शोध घेवुन गुन्हा उकल करण्याच्या सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक श्री. उस्मान शेख यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानीक गुन्हे शाखा येथील पोलीस उपनिरीक्षक श्री. सुशांत सुतळे यांचे नेतृत्वाखाली पथक तयार करुन गुन्ह्याचा समांतर तपास सुरु केला.

सदर गुन्ह्याचा तपास सुरु असतांना पोलीस उपनिरीक्षक श्री. सुशांत सुतळे स्था.गु.शा. हे त्यांच्या पथकासह सदर गुन्ह्याचा तपास करीत असतांना त्यांना सुमित सोनी यांचे दुकानात काम करणारा अनिकेत महादेव मगर रा. महात्मा फुले नगर, अंबाजोगई याचेवर संशय आल्याने तपास पथकाने त्यास ताब्यात घेवुन घेवुन विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्याने सदरचा गुन्हा केल्याचे कबुल करुन त्याने सदरचा गुन्हा त्याचे साथीदार १) तेजस अनिल तुरूकमारे रा. स्नेहनगर, अंबाजोगई २ ) कृष्णा दत्ता मुंडे रा. वडारवाडा, अंबाजोगई व त्यांचा एक अल्पवयीन साथीदार यांचेसह केल्याचे कबुल केले. त्यावरुन तपास पथकाने यातील आरोपींना ताब्यात घेवुन त्यांचेकडुन गुन्ह्यात चोरीस गेलेला १०,००० /- रुपये किंमतीचा वन प्लस मोबाईल, ५३,७६०/- रुपये किंमतीची ६ ग्रॅम ७२० मिली वजनाची सोन्याची अंगठी व गुन्ह्यात वापरलेली जुनी वापरती यामाहा कंपनीची ठ१५ मोटार सायकल असा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

सदर गुन्ह्याची उकल पोलीसांनी २४ तासाचे आत केली असुन यातील जखमी फिर्यादी श्री. सुजित सोनी हे झालेल्या घटनेनंतर घाबरलेले असल्याने त्यांना घटनास्थळ आठवत नव्हते. परंतु पोलीसांनी त तपास करुन घटनास्थळ निश्चीत केले. त्यानंतर जलदगतीने तपास करुन सदरचा गुन्हा



उघडकीस आणला आहे.सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत (भा.पो.से.), अपर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनिल चोरमले यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. उस्मान शेख स्था. गु. शा. पोनि श्री. घोळवे अंबाजोगाई शहर, सपोनि श्री. निलंगेकर अंबाजोगाई शहर पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोह/ १४६८ कांबळे, पोह/३०६ जायभाये, पोह/ २०९१ पठाण, पोह/ १५६५ राठोड, पोह/९८९ सानप, पोअ/१०५५ आंधळे व चालक पोह/ ७७९ वडमारे नेमणुक स्था. गु. शा. बीड यांनी केली आहे.

# जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या जीवनात उज्ज्वल प्रगतीची पहाट निर्माण करणे हेच माझे उद्दिष्ट आहे- आ.सुरेश धस

## जरेवाडी येथून व्ही.रमणी पॅटर्न चा शुभारंभ

पाटोदा (प्रतिनिधी)

जिल्हा परिषदांच्या शाळांमधून ग्रामीण भागातील गोरगरीब शेतकरी, शेतमजूर आणि ऊस तोडणी कामगार यांची मुले शिक्षण घेत असतात या मुलांच्या जीवनात प्रगतीची पहाट होणे आवश्यक असून जिल्हा परिषद शाळा मधील पहिली ते आठवी या वर्गातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी केंद्र शासनाच्या पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान धोरणानुसार आणि विद्यार्थ्यांची शैक्षणिक टक्केवारी वाढ होण्यासाठी चाचण्या घेण्यात याव्यात आणि विद्यार्थ्यांच्या टक्केवारी चे मूल्यमापन करताना शिक्षकांनी केलेल्या कामाचे निरीक्षण केले जावे जेणेकरून विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढवलेल्या चांगल्या शिक्षकांचे कौतुक आणि ज्या ठिकाणच्या विद्यार्थी शैक्षणिक टक्केवारी कमी पडेल तिथे शिक्षकांना जबाबदारीची जाणीव करून देणे अशा प्रकारचे शिक्षण पद्धती असणारे जरेवाडी पॅटर्न आणि मागील काळात राबवलेल्या वीरमणी पॅटर्न याचा समन्वय असलेली शिक्षण पद्धती जिल्हा परिषद शाळांमधून राबवावी यासाठी हा उपक्रम आयोजित केला आहे सर्वसामान्य गोरगरीब शेतकऱ्यांच्या मुलांच्या शैक्षणिक भवितव्यासाठी मी सतत प्रयत्नशील आहे आणि यापुढे राहील असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले जिल्हा परिषदेच्या जरेवाडी येथील एका विशेष कार्यक्रमांमध्ये ते प्रमुख मार्गदर्शन करताना बोलत होते यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जीवने उपस्थित होते पुढे बोलताना आमदार सुरेश धस म्हणाले की विधानसभा निवडणुकीतील प्रचार कालावधीत माझ्या आष्टी विधानसभा मतदार संघात जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता विकासासाठी व्ही. रमणी पॅटर्न राबवणार..असे आश्वासन दिले आणि आज तो सुरू होत असल्याचे समाधान आहे असे सांगत



जिल्हा परिषदेच्या शिक्षकांकडे असलेले अशैक्षणिक कामे कमी करून तपालासाठी शिक्षकांनी बीडला जाण्याची आवश्यकता नसून व्हाट्सअप मेसेज द्वारे काम करून शिक्षकांच्या टपाल फेऱ्या बंद कराव्यात जेणेकरून ते पूर्णवेळ शाळेला देतील.मला आठवतंय मी जिल्हा परिषदेचा उपाध्यक्ष असताना जरेवाडी शाळेची २२ ही पटसंख्या आज ९०० पटसंख्या असलेली शाळा झाली आहे.याचे सर्व श्रेय हे या ठिकाणी असलेल्या शिक्षकांना आणि ग्रामस्थांना जाते असे सांगून आ.सुरेश धस म्हणाले की, ऊसतोड मजुरांच्या पाल्य विद्यार्थ्यांकडे लक्ष देणे गरजेचे आहे कारण शाळाबाह्य विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष होत त्यामुळे याचे दुष्परिणाम होऊन शाळेची गुणवत्ता ढासळते शिवाय शिक्षणाचे प्रमाण कमी होते.हे आता कुठेतरी थांबले पाहिजे आणि मला विश्वास आहे माझ्या मतदार संघातील शिक्षक,केंद्रप्रमुख, बीईओ हा बहाद्दर आहे तो जरेवाडी शाळेतील शंभर टक्के विद्यार्थ्यांना लिहिता वाचता येणे आणि १००% विद्यार्थ्यांना गणिताच्या क्रिया येणे हा जरेवाडी पॅटर्न यशस्वी करेल याची मला खात्री असल्याचेही आ.धस म्हणाले.

जिल्हा परिषदेने नामांकित विद्यार्थी घडविले.याचे उत्तम उदाहरण म्हणजे अविनाश साबळे आहे प्रत्येक शाळेच्या शालेय व्यवस्थापन समिती,आणि सरपंचांनी हा पॅटर्न राबविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावेत अशी अपेक्षा व्यक्त करून प्रत्येक शिक्षकाची शिकवण्याची पद्धत वेगळी आहे.विद्यार्थ्यांना जे आवडेल त्या पद्धतीने शिक्षकांनी शिकवले पाहिजे असे माझे मत आहे.

ऊसतोड मजुरांची मुले असतील गोरगरिबांची लेकरं, दुर्बल घटकातील मुले शिकली पाहिजे हेच माझे ध्येय असल्याने जिल्हा परिषद शाळेसाठी जे करता येईल ते करण्याची माझी तयारी असल्याचेही धस शेवटी म्हणाले.यावेळी बोलताना मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने म्हणाले की जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांनी सकारात्मकतेने या पद्धतीने शिक्षण द्यावे चांगल्या कामाची दखल घेतली जाईल जिल्हा परिषदेच्या शाळांमधील शैक्षणिक दर्जा आणि गुणवत्ता अग्रेसर राहिली यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन केले

# स्वानंद सार्वजनिक वाचनालयात ग्रंथपरिक्षण व कथन स्पर्धा संपन्न

## प्रा.आनंदगांवकर यांनी केले ग्रंथपरिक्षण यावर मार्गदर्शन

केज/ प्रतिनिधी

स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता. केज.जि.बीड येथे दि.२९ डिसेंबर २०२४ ते दि.१६ जानेवारी २०२५ या कालावधीत वाचनसंकल्प महाराष्ट्राचा अंतर्गत दि१६ जानेवारी २०२५ रोजीग्रंथ परिक्षण व कथन स्पर्धा व ग्रंथ प्रदर्शन घेण्यात आले ग्रंथ परिक्षण या विषयावर जेष्ठ साहित्यीक,लेखक, कवी प्रा.माणीकराव आनंदगांवकर यांनी सखोल मार्गदर्शन केले. ग्रंथ परिक्षणातील खुबी अचूकपणे मांडली.ग्रंथ चांगला कि वाईट कसा ठरवायचा यावर विवेचन केले.ग्रंथ हेच मानवाचे खरे सोबती आणि मित्र असल्याचेही प्रतिपादन त्यांनी केले.त्यानंतर कथन स्पर्धा घेण्यात आली.कथनस्पर्धेत लक्ष्मी पुंड,श्रुती पुंड,रोहन गायकवाड,ज्ञानेश्वरी पुंड,



रविकिरण गायकवाड यांनी सर्वोत्तम असे कथन केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी नाना गायकवाड हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून शिवदास अप्पा गायकवाड,नारायण भाऊ गायकवाड,रावसाहेब भाऊ गायकवाड, रामकिसन भाऊ गायकवाड यांनीही उपस्थित राहून मनोगत व्यक्त केले.ग्रामसेवक श्री हेडगिरे यांनीही मनोगत व्यक्त केले.यावेळी कमलाकर साबळे, देविदास गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, बबन पुंड,संजय सोनवणे, रविंद्र गायकवाड,माजी सरपंच रामराजे गायकवाड,रावसाहेब जाधव,बापुराव गायकवाड,बालासाहेब गायकवाड,आर.एस. पाटील,सुखदेवगायकवाड,ईश्वरी गायकवाड, सिताराम वैरागे,बालाजी काळे,चंद्रकांतगायकवाड, दादासाहेब गायकवाड, शिवराज भोगजकर यांच्यासह वाचक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

त्यानंतर ग्रंथप्रदर्शनातही सर्वांनी सहभाग घेतला. यावेळी छत्रपती स्वराज्य रक्षक संभाजी महाराज राज्याभिषेक दिन छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आले.उपस्थित मान्यवरांचे शाल,पुष्पहार देवून ग्रंथालयाच्या वतीने ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,माजीप्राचार्य,जेष्ठ विचारवंत,जेष्ठ समाज सेवक वसुदेव बप्पा गायकवाड यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले तर आनंद भैय्या गायकवाड यांनी आभार मानले.




**उद्घाटन... शुभेच्छा..!**

**बीड शहरातील तिरूपती हाइटस येथे श्री शेळके पा. व खांडे पा.यांच्या..,..एके फायनान्स अँड इन्शुरन्स कंपनीचे उद्घाटनहभप श्रीहरी पवार महाराज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष.... मा.राजेंद्रजी मस्के यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. यावेळी अर्जुन क्षीरसागर, शिवसेनेचे गोरख शिंगन,अनिल शेळके यांच्यासह मान्यवर व मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.**


# वाल्मिक कराड अटक केली म्हणून नांदुरघाट केज मार्गावर टायरजाळून नागरिकांचे आंदोलन

## तर दिव्यांग नाना चौरे यांचे पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन

केज/प्रतिनिधी

दिनांक १७ जानेवारी २०२५ रोजी केज तालुक्यातील नांदुरघाट केज रोडवर टायर जाळत आंदोलन केले तर दिव्यांग असलेल्या नाना चौरे याने राजेगाव फाटा येथे वाल्मीक कराड यांच्या वरील दाखल केलेले खोटे गुन्हे मागे घ्या म्हणत पाण्याच्या टाकीवर चढुन आंदोलन केले.तसेच नागरिकांनी रस्त्यावर टायर जाळून आंदोलन केले आहे.याबाबत सविस्तर माहीती अशी की,नाव्होली येथील नाना चौरे नामक दिव्यांग व्यक्तीने पाण्याच्या टाकीवर चढून सकाळी नऊ वाजल्यापासून सायंकाळी सहावाजेपर्यंत आंदोलन केले आहे.आंदोलकांचे म्हणणे आहे





की,स्व.संतोष देशमुख यांच्या हत्येमध्ये वाल्मीक कराड यांचा सहभाग दर्शवून अटक केली आहे.वाल्मीक कराड यांच्यावर खोटे गुन्हे दाखल केलेआहेत.ते दाखल केलेले गुन्हे मागे घ्या.धनंजय मुंडे यांच्या राजीनामा का मागता? असा संतप्त सवाल आंदोलकांनी केला आहे.

दिव्यांग व्यक्ती नाना चौरे यांनी पाण्याच्या टाकीवर चढून जोपर्यंत वाल्मीक कराड यांच्यावरील गुन्हे मागे घेत नाही तोपर्यंत मी खाली उतरणार नाहीअसे म्हणत आंदोलन चालू ठेवले होते पोलीस कर्मचारी यांच्या मदतीने त्यांना खाली उतरण्यात आले.आंदोलन स्थळी तहसीलदार राकेश गिड्डे, पोलीस निरीक्षक वैभव पाटील,पोलीस कर्मचारी यांनी भेट दिली. शिष्टमंडळ तयार करा, उप विभागीय पोलिस अधिकारी श्रीमती चेतना तिडके मॅडमची भेट घालून देतो,जिल्हापोलिस अधिक्षक श्री.नवनीत कावत साहेबांची भेट घालून देतो असेआश्वासन दिल्यानंतर आंदोलकांनी आंदोलन मागे घेतले.आंदोलनामध्ये परिसरा तील ग्रामस्थांचा मोठ्या संख्येत सहभाग होता.

# विवाहतेची गळफास घेऊन आत्महत्या

परळी / प्रतिनिधी

स्वयंपाकघरातच गळफास लावून एका गृहिणीने आपले जीवन संपविल्याची घटना दि.१६ रोजी सायंकाळच्या सुमारास परळी शहरातील माणिकनगर भागात घडली आहे. याबाबत आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.याबाबत पोलीस सूत्रांकडून प्राप्त अधिक माहितीनुसार, मयत ३५ वर्षिय महिलेने माणीकनगर परळी वै. येथील राहते घरी स्वयंपाकघरातच स्लॅबच्या लोखंडी कडीला गळफास लावून आत्महत्या केली. आत्महत्या करण्याचे कारण अद्याप अस्पष्ट आहे. दुर्गेश्वरी विजयकुमार बकरे असे मयत महिलेचे नाव आहे. याप्रकरणी मयत महिलेचा पती विजयकुमार उत्तमराव बकरे यांच्या खबरीवरुन पोलीस ठाणे परळी शहर येथे आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# मस्साजोग येथील आवादा एनर्जी कंपनीच्या मजुराचा रस्त्यावर संशयास्पद मृत्यू

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील मस्साजोग बहुचर्चित आवादा एनर्जी या पवन ऊर्जा कंपनीतील पंजाब राज्यातील मजुराचा केज येथील रस्त्यावर मृत्यू झाला असल्याची खळबळ जनक घटना घडली आहे.मृत्यू नेमका कशामुळे झाला हे अद्याप समजू शकलेले नाही.या बाबत सविस्तर माहीती अशी की,पंजाब राज्या तील हा कामगार केज तालुक्यातील मस्साजोग येथील आवादा एनर्जी या पवन ऊर्जा कंपनीत मजूर म्हणून काम करीत होता. त्याचे नाव रचपाल हमीद मसीह असून तो पंजाब राज्यातील गुरुदासपूर येथील रहिवासी आहे. केज शहरातील केज




अंबाजोगाई रस्त्यावर असलेल्या एका बिअरबार समोर त्याचा मृतदेह रस्त्यावर पडला असल्याचे दिसुन आले. त्यानंतर केज पोलिसांनी हा मृतदेह शवविच्छेदन करण्यासाठी ताब्यात घेतला आहे.याप्रकरणाचा तपास केज पोलीस करत आहेत.

# बापुजी नगर येथील महिला बेपत्ता

बीड (प्रतिनिधी)

शहरातील बापूजी नगर धानोरा रोड येथील महिला वय ३० वर्ष रंग सावळा उंची ५ फुट ५ इंच अंगात निळ्या रंगाचा ड्रेस असून गुलाबी कलरचा स्वेटर जॅकेट आहे. ती दि.१६ जानेवारी घरातून ६ वाजण्याच्या दरम्यान कोणालाही न सांगता घरातून निघून गेली आहे. तिचा शोध सर्वत्र घेतला मात्र ती अद्यापही सापडली नाही त्यामुळे दि. १७ रोजी सायंकाळी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. आई, वडील,



बहिण, भाऊ त्यांचा शोध घेत आहे कोणाला आढळल्यास शिवाजीनगर पोलीस किंवा मुलीचे वडील श्री दत्तात्रेय मुरलीधर बेदरे मो. ८३०८६०३९३१ यांना संपर्क साधावा.

# विडा येथे शालेय पोषण आहारातील खिचडीतुन विद्यार्थ्यांना विषबाधा, उलट्या व मळमळीचा त्रास

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील विडा येथील शाळेत शालेय पोषण आहाराची खिचडी खाल्ल्याने ३४विद्यार्थ्यांना खिचडीतून विषबाधा झाल्याचा प्रकार घडला असून सध्या विद्यार्थ्यांची प्रकृती ठीक असल्याची माहिती तालुका आरोग्य अधिकारी डा.श्री.गवळी यांनी दिली आहे.याबाबत सविस्तर माहीती अशी की,केज तालुक्यातील विडा येथिल रामकृष्ण महाराज विद्यालयात दि.१७ जानेवारी २०२४ शुक्रवार रोजी शालेय पोषण आहार म्हणून खिचडी शिजवली होती. सदरील पोषण आहार एकूण १३२ विद्यार्थ्यांनी सेवन केली यातील एकूण ३४ विद्यार्थ्यांना एक तासाने मळमळ,उलट्या, चक्कर येणे,डोकं दुखणे अशा तक्रारी सुरु झाल्या. सदरील प्रकारविद्यार्थ्यांनी शिक्षकाला सांगितल्या नंतर विद्यार्थ्यांनातात्काळ विडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले.त्यानुसार ३४ पैकी २७ विद्यार्थ्यांवर उपचार करून घरी पाठवण्यात आले तर सात विद्यार्थ्यांना केज येथील उप जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.दरम्यान तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अशोक गवळी यांनी तात्काळ विडा येथील आरोग्य केंद्रात भेट देऊन कर्मचाऱ्यांना सूचना करून योग्य तो उपचार केला.सदर प्रकार पाली च्या लेंड्या तसेच उंदराच्या लेंड्यामुळे अशी विषबाधा होऊ शकते अशी माहिती डॉ.अशोक गवळी यांनी सांगितले. दरम्यान सदरच्या घटनेला जबाबदार असलेल्यांवर काय कारवाई होते हे पहाणे महत्त्वाचे ठरणार आहे.



# खळबळजनक : मोरेवाडी परिसरात तरुणाने केला घरावर गोळीबार

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

सद्यस्थितीत बीड जिल्ह्यातील वातावरण अतिशय संवेदनशील असताना अंबाजोगाई शहरात गोळीबत झाल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. शहरालागत असलेल्या मोरेवाडी परिसरात ही धक्कादायक घटना आज शुक्रवारी सकाळी घडली. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मोरेवाडी परिसरातील माऊलीनगर येथील एका घरावर माथेफिरू तरुणाने गोळी झाडली. सुदैवाने ही गोळी घराच्या खिडकीवर लागल्याने कोणासही इजा झाली नाही. गोळीबारानंतर त्या तरुणाने घटनास्थळाहून पलायन केले. सदरील तरुण रेणापूर येथील रहिवासी असून ही घटना एकतर्फी प्रेमातून घडली असल्याची माहिती सूत्रांनी दिली. अंबाजोगाई शहर पोलीस या तरुणाचा कसून शोध घेत असून त्याला अटक झाल्यानंतरच या घटनेमागचे खरे कारण समोर येऊ शकणार आहे.